IRBK-0103137

IRBK-0103137

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें

विषय व्यो.वा.

दा. क्र. ३१३८



पूज्य साने गुरुजी

दा० क्र- ३९३

# साने गुरुजींचा आशीर्वाद

## जय हिंद

साधना कार्यालय,
ऑर्थर रोड, मुंबई ११

न्मित्राचे संपादक श्री. पारुजी नारायण मिसाळ यांनीं
मुलांची थोर सेवा केली आहे. त्यांचा उत्साह उतार-
वाढतच आहे. 'आम्ही सारे भाऊ भाऊ' हें त्यांचें
चून मला आनंद झाला. लोकशाहीचा, समता हा पाया
पला देश नाना धर्म, जातपात, यांतील भांडणांनीं
गेला आहे, श्रेष्ठकनिष्ठपणाच्या भ्रामक रूढींनीं देशाचें
कसान झालें आहे. समतेचा घोष सर्वत्र न्यायला हवा
, मिसाळ गुरुजींनीं ही आजची निकडीची गोष्ट
आणि मुलांना करतां येईल असें हें सुंदर नाटक
श्रेष्ठकनिष्ठपणाचीं थोतांडें कशीं भ्रममूलक आहेत, तें
फार सुंदर व परिणामकारक रीतीनें त्यांनीं दाखविलें
द्यार्थी 'आम्ही सारे भाऊ भाऊ' हें नाटक खेडोपाडीं
ोत. मी श्री. मिसाळांचें अभिनंदन करतों. आजच्या
अनुरूप अशीं नाटकें ते मुलांमुलींना प्रचारार्थ देवोत.
गैरे संस्थांना असलें वाङ्मय आधीं हवें आहे. जो
ाष्ट्राचा उपकारक-कर्ता. मी पुन्हा एकदां या नाटकाचें
करतों.

पां. स. साने



## दो न श ब्द

' जातीयता नष्ट करा ' हा मुख्य हेतु धरून राष्ट्रसेवादलाच्या मुलांसाठीं प्रचारार्थ म्हणून हें तीन अंकी स्त्रीपात्रविरहित " आम्ही सारे भाऊ भाऊ " ( समतानंद ) नाटक मुद्दाम लिहिलें आहे. या नाटकांतील पद्यें राष्ट्रसेवादलाचे रत्नागिरी जिल्हा प्रमुख श्री. शिखरे गुरुजी यांनीं केलीं आहेत.

राष्ट्रसेवादलाच्या व शाळांच्या निरनिराळ्या समारंभप्रसंगीं या नाटकाचे प्रयोग करून जनतेंत जागृति होईल व जातीयता नष्ट करण्यास या नाटकाचा अल्पस्वल्प तरी उपयोग होईल अशी आशा आहे.

बालसन्मित्र कार्यालय,
मालवण, दीपावलि १९४९

—पा. ना. मिसाळ

या नाटकाच्या प्रयोगाचे हक्क श्री. **दामोदर मिसाळ**, मालवण, यांच्याकडे



आहेत. प्रयोग-दक्षणा **तीन रुपये** पाठवून परवानगी घ्यावी व प्रयोग करावा.

ज्याच्या रोमरोमीं जातीयतेचा तिटकारा व समतेची आवड
भरून राहिली होती त्या माझ्या सत्पुत्रास



—कै. नारायण ( आप्पा ) मिसाळ—

त्याच्याच आवडत्या विचारांचें हें नाटक साश्रु समर्पण

IRBK-0103137

आम्ही सारे भाऊ भाऊ ( समतानंद ) या नाटकाचा प्रथम प्रयोग ' **समतानंद नाट्यविकास** ' नें दि० ८–५–४९ रार्जी सरस्वती टॉकीज, मालवण येथें करून दाखविला. त्यांत खालीलप्रमाणें भूमिका केल्या होत्या.

| | | |
|---|---|---|
| समतानंद<br>मानसिंग | : | **दामोदर मिसाळ** |
| अण्णासाहेब | : | **मधु वालावलकर** |
| बाबासाहेब | : | **मोहनदास खांडाळेकर** |
| विनायक | : | **एस्. के. पाटील** |
| गोविंद | : | **साबाजी परुळेकर** |
| नारायण | : | **अनंत केळुसकर** |
| पीटर | : | **गोविंद सकपाळ** |
| गजाभाऊ | : | **विनायक शिखरे** |
| अबदुल्ला | : | **महादेव मांजरेकर** |
| दिग्दर्शक | : | **बाबा पाटकर** |
| सहाय्यक | : | **गुरुनाथ ओटवणेकर** |
| पेटीवादक | : | **दिवाकर अभ्यंकर** |

# आम्ही सारे भाऊ भाऊ

## अंक पहिला

[ बाबासाहेबांचा दिवाणखाना. तेथें एका बाजूस पुढ्यांत डेस्क घेऊन बाबासाहेबांचा कारकून **विनायकराव** कांहींतरी लिहीत बसला आहे. इतक्यांत **अण्णा** प्रवेश करतो. मध्यभागीं एक राउंड टेबल असून त्यावर निरनिराळीं वर्तमानपत्रें पडलीं आहेत. टेबलाजवळ दोन तीन खुर्च्या आहेत. तेथें लोकमान्य टिळक, शिवाजी, जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी इत्यादींचे फोटो झळकत आहेत. ]

**अण्णा** : विनायकराव, परवां दिवाळी आहे. दिवाळीच्या फराळासाठीं मी माझ्या मित्रांना व सहकाऱ्यांना आपल्या वाड्यांत बोलावण्याचा विचार ठरविला आहे.

**विनायक** : [ अत्यंत नम्रपणानें लवून व दोन्ही हात जोडून ] बरोबर, बरोबर अण्णासाहेब, आपलं म्हणणं अगदीं बरोबर आहे ! देवानं आपल्याला काय कमी केलं आहे ? आपली मित्रमंडळी फराळास बोलावणार, त्यांत मला तें काय सांगायचं ? बोलवावी, खुशाल बोलवावी.

**अण्णा** : आहे. तुम्हाला सांगण्यांत माझा विशेष हेतु आहे. तुमच्याकडून एवढी कामगिरी झालीच पाहिजे !

**विनायक** : वा ! यांत काय संशय ! छोटे धनीसाहेब, मी तुमचा बंदा नोकर. तुम्ही सांगाल ती कामगिरी पार पाडण्यास मी अगदीं एका पायावर तयार आहें. फराळाचे सारे जिन्नस तयार

झालेच आहेत. आणखी काय पाहिजे तें आपण सांगण्याचाच अवकाश, कीं लगेच—

**अण्णा** : ( मध्येंच त्याला थांबवून ) छे, विनायकराव, मला फराळाच्या जिनसांबद्दल सांगायचं नाहीं.

**विनायक** : मग दुसरं काय सांगायचं आहे ?

**अण्णा** : माझे विचार तुम्हाला माहीतच आहेत.

**विनायक** : आणि ते नेहमी बरोबरच असतात. अण्णासाहेब, आपल्या विचारांना कोण नांव ठेवील ? मला ते फारच आवडतात.

**अण्णा** : तें खरं हो, पण बाबासाहेबांना ते कुठं आवडतात ?

**विनायक** : चालायचं ! चालायचं ! बाबासाहेबांचं काय ? आतां वय झालं आहे. ते धार्मिक वृत्तीचे आहेत. त्यांना तुमचे कांहीं विचार पसंत पडले नाहींत म्हणून कुठं बिघडलं ? अहो, हें असं चालायचंच ! माझ्या घरीं तरी काय ? माझ्या मुलाला नि मुलीला तरी माझे विचार कुठं पसंत पडतात ? माझे त्यांचे असल्या बाबतींत पुष्कळ वेळां खटके उडतात !

**अण्णा** : पण बाबासाहेबांचा नि माझा तसा खटका उडूं नये !

**विनायक** : छे ! छे ! छे ! छे ! भलतंच कांहींतरी ! तुमचा आणि बाबासाहेबांचा खटका ? कालत्रयीं अशी गोष्ट घडायची नाहीं ! बाबासाहेबांचं आपल्यावर केवढं अलोट प्रेम आहे, तें आपणांस सांगून समजायचं नाहीं. बाबासाहेबांच्या नोकरींत मी माझी सारी हयात घालविली. माझ्या काळ्याचे पांढरे इथंच झाले. आपल्यापेक्षां मी बाबासाहेबांना जास्त ओळखतों.

**अण्णा** : म्हणून तर तुम्हाला माझी कामगिरी सांगत आहें.

**विनायक** : सांगा, बेलाशक सांगा. कांहीं झालं तरी आपण माझे धनीच आहांत. हुकूम करा, बंदा तो बजावण्यास तयार आहे.

१५०४८

**अण्णा** : हें पहा विनायकराव, परवां फराळास जी मंडळी येणार, त्या सर्व मंडळीन्नं सहभोजन घडवून आणायचं असा माझा विचार आहे.

**विनायक** : अगदीं बरोबर. अगदीं बरोबर आहे छोटे धनीसाहेब. आपल्या-सारख्या सूज्ञ, सुशिक्षित, चतुर, विचारी, लोकप्रिय मालकांनीं ठरविलेल्या विचारांत कधींहि चूक असणार नाहीं. तो बिन-चूकच असणार.

**अण्णा** : मी असें ठरविल्याचं बाबासाहेबांना सांगून त्यांची परवानगी मिळवायची आहे. एवढी कामगिरी तुम्ही करायची.

**विनायक** : हात्तेच्या ! यांत हो काय कठीण आहे ? बाबासाहेबांची परवानगी या गोष्टीला शंभर टक्केच नव्हे तर दोनशें टक्के मिळेल यांत मला बिलकूल शंका वाटत नाहीं !

**अण्णा** : चुकताहां विनायकराव तुम्ही ! तीच गोष्ट तर मला कठीण वाटते आहे.

**विनायक** : काय अण्णासाहेब आपली भलतीच शंका ! आपणास परवानगी देण्यास बाबासाहेब बिलकूल आडकाठी करणार नाहींत. बाबासाहेबांचं आपणावर अलोट प्रेम आहे. आपण त्यांचे एकुलते एक चिरंजीव ! आईवेगळं मूल म्हणून ते आपणांस तळहातावरील फोडाप्रमाणें जपतात. आपल्या आवडी पुरवितात, मग यांत कठीण तें काय ?

**अण्णा** : मी जातपात मानीत नाहीं. मला उच्च-नीच भेद आवडत नाहींत.

**विनायक** : फार थोर आहे मन आपलं. तसंच असलं पाहिजे. थोरपणाचीं लक्षणं आहेत हीं.

अण्णा : मी जी मंडळी बोलावणार आहें त्यांत आपल्या हिंदु धर्मांतील सर्व जातीची मंडळी असणार. ते सारे माझे धर्मबंधु आहेत. " आम्ही सारे भाऊ भाऊ. "

विनायक : खरं खरं ! आम्ही सारे भाऊ भाऊ. हिंदु धर्मांची सर्व मंडळी असलीच पाहिजे. आपले धर्मबंधु ना ते ? धर्मबंधूंना बोलावूं नयें असें कोण म्हणेल ? बाबासाहेब तरी कां नको म्हणतील ?

अण्णा : महार, चांभार, धेड, भंगी हेहि आपल्या धर्मांतीलच आहेत. ते आपले धर्मबंधु तसे देशबंधुहि आहेत विनायकराव.

विनायक : मग त्यांना बोलवा ना अवश्य.

अण्णा : त्याप्रमाणें अबदुल्ला, पीटर हे माझे मुसलमान व ख्रिश्चन मित्रहि येतील.

विनायक : मग त्यांनाहि येऊं देत की ! खर्चाच्या बाबतींत बाबासाहेबांचा हात सढळ आहे. आणि आपल्या बाबतींत ते बिलकूल काटकसर करायला सांगणार नाहींत. येऊं द्या. येईल तेवढी मंडळी येऊं द्या ! तुमचं काम फत्ते ! शंका कसली बाळगतां ?

अण्णा : छे ! महार, चांभार, मांग, धेड, भंगी स्पृश्य, अस्पृश्य, सर्व हिंदु, तसेच मुसलमान, ख्रिश्चन, आणखी येतील त्या धर्मांचे लोक बोलवायचे आणि—

विनायक : वाः वाः ! छोटे धनीसाहेब, आपण बेत तर नामी ठरवला आहे. करूं वेगवेगळ्या पांच सात पंक्ती नि बसवूं निरनिराळे !

अण्णा : छे छें ! निरनिराळ्या पंक्ती बसवायच्या नाहींत. सहभोजन करायचं आहे सहभोजन ! कोणताहि भेदभाव न मानतां एका

पंक्तीला मांडीला मांडी लावून बसायचं आणि साऱ्यांनीं एका वेळीं एकत्र खायचं प्यायचं. आलं ना लक्षांत माझं म्हणणं ?

**विनायक** : ( टुणकन् उडी मारून बाजूला होतो. ) च् च् च् च् !

**अण्णा** : कां विनायकराव ? असे गडबडलांतसे ? घाबरलांत कीं काय माझं म्हणणं ऐकून ?

**विनायक** : छे धनीसाहेब ! ( उगीच आंगरख्यांत हात घालून खाजवल्यासारखं करतो ) हा शिंचा ढेकूण केव्हांपासून माझ्या अंगरख्यांत दडून बसला आहे. कसा सडकून चावला आहे म्हणतां मला ! त्यामुळें मी घाबरून उडी मारली ! तुमच्या म्हणण्याला कांहीं घाबरलों नाहीं मी !

**अण्णा** : मग या सहभोजनाची सारी तयारी आमच्या वाड्यांत झाली पाहिजे आणि तें करण्यास तुम्ही बाबासाहेबांची परवानगी मिळवून दिली पाहिजे. तुम्ही त्यांच्या मर्जीतले आहां, तुमचा शब्द ते मानतात, म्हणून मुद्दाम तुमच्यावर ही कामगिरी सोंपवीत आहें.

**विनायक** : प–प–पण तसं कांहीं नाहीं, तरी ऽऽ ( विचारांत पडतो. )

**अण्णा** : काय झालं ? सारं अवसान खलास झालं वाटतं ? तुम्ही मला असेच परवानगी मिळवून देणार वाटतं ? तुमचा धीर गळून गेलेला दिसतो विनायकराव !

**विनायक** : ( डोक्यावरून व हातावरून हात फिरवून ) धीर ! तसा कांहीं गळालेला नाहीं. बाबासाहेबांचा स्वभाव किती संतापी आहे, तुम्हाला माहीतच आहे तो. तथापि मी युक्तिप्रयुक्तीनें तुमची बाजू त्यांच्यापुढं मांडतों आणि प्रयत्न करून पहातों. आपण नका काळजी करूं. माझ्यावर पूर्ण विश्वास ठेवा तुम्ही.

**अण्णा** : बरें तर, मी माझ्या मित्रांना आमंत्रण द्यायला जातों. मला कांहीं काळजी करण्याचं कारण नाहीं म्हणतां ना तुम्ही ?

**विनायक** : छे हो ! त्यांत कसली आली आहे एवढी काळजी ? निर्धास्त चला तुम्ही आपल्या कामाला.

[ अण्णा जातो. थोड्या वेळानें बाबासाहेब येतात. विनायक बाबासाहेब बसले आहेत तिथं विचारमग्न स्थितींत येतो. ]

**बाबासाहेब** : अहो विनायकराव, अण्णा कुठं आहे ?

**विनायक** : अण्णासाहेब नुकतेच बाहेर आपल्या मित्रांना भेटायला गेले आहेत.

**बाबासाहेब** : ( त्रासानें कपाळाला आंठ्या घालून ) काय पोराला वेड लागलं आहे ! दिवसभर घराबाहेर. मित्र, राष्ट्र, देश, देशभक्ति, दल, सभा, एक ना दोन, शेंकडों धंदे पण ते सारे रिकामटेकडेच बरं का ! एक तरी फायद्याचा आहे का ?

**विनायक** : खरं, खरं, अगदीं खरं आहे आपलं म्हणणं. आपण अण्णासाहेबांना अगदीं तळहाताच्या फोडाप्रमाणं वागवतां; पण त्यांना कुठं आहे त्याची किंमत ? देवानं संपत्ति दिली आहे, आपल्यासारखे वडील सगळा कारभार पहाताहेत. खावं, प्यावं, ऐषआराम भोगावा, खुशाल चैनींत नि आनंदांत दिवस घालवावे, तें सोडून त्यांना नसते उपद्व्याप सुचतात; उपद्व्याप.

**बाबासाहेब** : उपद्व्याप नाहीं तर काय ? मी त्याला किती सांगून पाहिलं; पण ज्याचं नांव तें ! तो बिलकूल ऐकायला तयार नाहीं ! इतर लोकांच्या पोरांना पैसा अडका नाहीं म्हणून तीं दारिद्र्यांत दिवस काढतात आणि याच्यापुढें लक्ष्मी हात जोडून सेवेला तयार असतांना हा जाणून बुजून कंगालपणा पत्करतो ! काय म्हणावं याच्या शहाणपणाला ?

**विनायक :** मी तरी तेंच म्हणतों बाबासाहेब, अण्णासाहेबांनीं असं कां वागावं, कळत नाहीं मला.

**बाबासाहेब :** भिकारड्या लोकांची संगत, दुसरं काय ? अरे, देवानं तुला भरपूर संपत्ति दिली आहे, तिचा उपभोग घे, चांगला रुबाबदार पोषाख कर, लोकांत ऐटीनं मिरव, असं म्हटलं तर तो ऐकायला तयार नाहीं. दरिद्यासारखा खादीचा जाडाभरडा पोषाख करायचा आणि वणवण हिंडायचं भिकारड्यासारखं.

**विनायक :** भिकाऱ्यासारखं तर काय ? खरं विचाराल बाबासाहेब, तर अगदीं आपल्यासारखं माझं मत आहे. अण्णासाहेबांनीं चांगला पोषाख करावा, दागदागिने अंगावर घालावे आणि मोटारींतून फिरावं असं मला वाटतं !

**बाबासाहेब :** मग तुम्ही तसं त्याला कां नाहीं सांगत ?

**विनायक :** एकदां का दोनदां ? शेंकडों वेळां सांगितलं असेल, अण्णासाहेब, असला भिकारडा खादीचा वेष करूं नका म्हणून ! पण असं सांगितलं कीं ते म्हणतात, 'आपला देश गरीब आहे."

**बाबासाहेब :** हेंच, हेंच आपलं त्याचं नेहमीचं पालुपद. खड्ड्यांत गेला तो देश ! करायचा काय याला तो देश घेऊन ? दगडामातीचा देश, त्यावर कसलं प्रेम करायचं नि भक्ति करायची !

**विनायक :** हे देशभक्त म्हणवणारे नि देशाची भक्ति करायला निघालेले सारे दगडच आहेत असं वाटतं !

**बाबासाहेब :** दगड नाहीं तर काय ? दगडाचे बाप ! अकलेचं नि यांचं वांकडं. काय म्हणे सूत काढा, मग स्वराज्य मिळेल !

विनायक : सुतानं स्वर्गाला जाणारे हे दीडशहाणेच कीं नाहीं! यांना कसलं मिळतंय् हो स्वराज्य! 'आम्हाला स्वराज्य मिळालं,' 'आम्हाला स्वराज्य मिळालं,' म्हणून उगीच बोंब मारताहेत झालं!

बाबासाहेब : कसलं स्वराज्य नि कुठलं काय? हे महामूर्ख लोक कसलं स्वराज्य चालविणार?

विनायक : छे! नाहींच तें व्हायचं. बाबासाहेब, आपलं म्हणणं सोळा आणे खरं आहे, सोळा आणे!

बाबासाहेब : कुठं सूत काढा, खादी वापरा, भिकार पोषाख करा, हिंदु मुसलमानांची एकी करा, हा यांचा उपदेश! हिंदु मुसलमानांची एकी या जन्मींच नव्हे, तर सात जन्मींहि होणार नाहीं!

विनायक : अगदीं अगदीं खरं. शंभर टक्के खरं बोललां आपण बाबासाहेब!

बाबासाहेब : आणि काय म्हणे अस्पृश्यता हा आपल्या हिंदु धर्मावरील कलंक आहे. त्या अस्पृश्यांना हरिजन म्हणा. त्यांना हॉटेलांत बसवा, देवळांत घुसवा! घरांत न्या, पंक्तीला घ्या! छे छे छे छे! सारा सारा भ्रष्टाकार!

विनायक : हिंदु धर्मांतलं काय कळतं आहे हो यांना? (चटकन् आठवलें करून) हो हो, सारंच मुसळ केरांत! बरी आठवण झाली. अण्णासाहेबांनीं एक घाट घातला आहे.

बाबासाहेब : तो कसला काय?

विनायक : परवां दिवाळीच्या फराळाला म्हणून अण्णासाहेब आपल्या सर्व मित्रांना आपल्या वाड्यांत बोलावणार आहेत.

**बाबासाहेब** : बोलावीना, बोलावू दे कीं ! असल्या त्याच्या हौसेच्या आड मी येणार नाहीं कधीं.

**विनायक** : तें खरं बाबासाहेब, पण—

**बाबासाहेब** : पण काय ? खर्चाचीच बाब ना ? मी त्याची मुळींच फिकीर करीत नाहीं ! अण्णाचे शेंकडों काय, हजारों सोबती येऊन फराळ करून गेले, तर मला त्यांत आनंदच वाटेल. वाटेल तेवढा खर्च झाला तरी चालेल.

**विनायक** : बाबासाहेब, आपली उदारता आणि खर्चिकपणा यांना या पंचक्रोशींत तोड नाहीं. मी खर्चाबद्दल म्हणत नाहीं, काळजी दुसरीच आहे.

**बाबासाहेब** : ती कसली ?

**विनायक** : अण्णासाहेब आपल्या सोबत्यांना बोलावणार आहेत फराळाला नि ते सगळे मिळून सहभोजन करणार आहेत. त्यांत कोण कोण आहेत समजलं ? मुसलमान, ख्रिश्चन, महार, चांभार, धेड, भंगी, अठरा पगड सारी जात ! स्पृश्यास्पृश्य झाडून सारे असणार म्हणे त्यांत !

**बाबासाहेब** : म्हणजे हा सारा सब्बगोलंकार आमच्या वाड्यांत करणार ?

**विनायक** : हो हो ! तोच तर त्यांचा हेका आहे ! मी त्यांची किती विनवणी केली, किती समजूत घातली, पण छे ! ते मुळींच ऐकायला तयार नाहींत.

**बाबासाहेब** : तो हवं तें म्हणेल; पण मी त्याचा हेका चालू देईन तेंव्हां ना ? असला भ्रष्टाकार आमच्या वाड्यांत, प्रत्यक्ष आमच्या डोळ्यांदेखत प्राण गेला तरी चालू देणार नाहीं मी. अस्पृश्याला

माझ्या घराची पायरी चढूं देणार नाहीं नि आपला श्रेष्ठ धर्म बुडूं देणार नाहीं !

**विनायक** : बाबासाहेब, आपली धर्मनिष्ठा आहेच तशी जाज्वल्य ! आपल्या घरीं अस्पृश्यांना येऊं देऊं नये हेंच खरें.

( इतक्यांत गोविंद जाधव येतो. )

**गोविंद** : अण्णासाहेब आहेत का घरीं ?

**विनायक** : छे ! ते नुकतेच बाहेर गेले आहेत.

**बाबासाहेब** : पण त्याच्याकडे काय काम आहे तुझं ?

**गोविंद** : शेजारच्या गांवीं जुनं राममंदिर आहे. तिथं हरिजनांचा मंदिरप्रवेशाचा कार्यक्रम व्हायचा आहे.

**बाबासाहेब** : म्हणजे सारे महार, चांभार देवळांत घुसवून देव बाटवणार तुम्ही कॅांग्रेसवाले नि देशभक्त.

**विनायक** : सारा भ्रष्टाकार ! सारा भ्रष्टाकार !

**गोविंद** : त्यांत कसला आला आहे भ्रष्टाकार ? नि देव तरी कसा बाटणार ?

**बाबासाहेब** : महार, चांभार देवळांत घुसणार, देवाला शिवणार; मग देव बाटणार नाहीं ? चमत्कार आहे !

**गोविंद** : मुलाच्या स्पर्शानें बाप बाटतो ? मुलगा शिवला कीं आई बाटते ? हा मोठा अद्भुत चमत्कार आहे म्हणायचा या जगांत !

**विनायक** : मग सारे धर्मग्रंथ खोटेच म्हणायचे कीं काय ?

[ इतक्यांत नारायण येतो. 'ये बैस' म्हणून त्याला गोविंदाशेजारीं बसायला लावतात.]

**नारायण** : धर्मग्रंथ तरी कुणी निर्माण केले ? आम्ही माणसांनींच ना ?

**बाबासाहेब** : माणसांनीं केले नाहींत, प्रत्यक्ष परमेश्वरानं रचले आहेत ते वेद नि वेदप्रणीत आमचा धर्म.

**नारायण** : ( हंसून ) त्या परमेश्वराला दुसरा कांहीं धंदा नव्हता वाटतं वेद रचण्याशिवाय ?

**विनायक** : अशी थट्टा करूं नये बाबा देवाधर्माची !

**गोविंद** : मग देवाधर्मानं मात्र थट्टाच नव्हे, फजिती करावी माणसांची ! हा 'शिवूं नये' 'आपडूं नये' चा कसाला धर्म ? म्हणे भावानं भावाला शिवूं नये !

**बाबासाहेब** : भावानं भावाला शिवूं नये असं आपला धर्म नाहीं सांगत. रामलक्ष्मणासारखीं उत्कृष्ट बंधुप्रेमाचीं उदाहरणं आहेत त्यांत.

**नारायण** : बाबासाहेब, देव म्हणजे जगत्पिता ना ?

**बाबासाहेब** : हो हो. जगत्पिताच आहे तो.

**विनायक** : अगदीं सोळा आणे खरं आहे बाबासाहेबांचं म्हणणं.

**गोविंद** : हीं पृथ्वीवरचीं सारीं माणसं त्यानंच ना निर्माण केलीं ?

**बाबासाहेब** : हो. त्यानंच निर्माण केलीं. तीं सारीं त्याचींच लेंकरं आहेत.

**नारायण** : मग काय हो ? हा एवढा कठोर हृदयाचा बाप कसा ? एका मुलाला म्हणतो माझ्याजवळ ये, मला स्पर्श कर नि दुसऱ्या लेंकराला म्हणतो अरेरे ! दूर दूर ! शिवूं नको, शिवूं नको ! तुझा विटाळ होईल मला !

**गोविंद** : हा बाप म्हणतो, माझ्या घरांत येशील तर खबरदार. तुला घरांत शिरण्याला बहिष्कार ! तूं आंत शिरलास कीं हें घर बाटेल ! जागा बाटेल नि मीही बाटेन ! हा काय बाप ?

**विनायक** : मग काय ? सारे धर्मशास्त्री चुकलेच ?

**गोविंद** : चुकले आहेत यांत काय संशय ?

**बाबासाहेब** : ते चुकले कीं नाहीं याचा विचार करण्यास आपल्याला काय अधिकार ? आपण माणसें आहोंत.

**नारायण** : काय माणसें ? आपण माणसं आहोंत असं मी तरी म्हणायला तयार नाहीं.

**बाबासाहेब** : मग काय जनावरं ?

**गोविंद** : जनावरं कितीतरी बरीं. तेवढीहि योग्यता कित्येक माणूसरूपी जनावरांची नाहीं. यांना माणसं म्हणायला खरोखरच लाज वाटते लाज !

**विनायक** : उगीच कांहींतरी बोलतोस झालं !

**नारायण** : उगीच कांहींतरी नव्हे, अगदीं खरं आहे. तुमच्याच भाषेंत बोलायचं म्हणजे अगदीं सोळा आणे खरं आहे !

**बाबासाहेब** : असं एकादं उदाहरण दाखवशील ?

**गोविंद** : एकच का, शेंकडों उदाहरणं दाखवितां येतील !

**विनायक** : मग सांग ना एकादं. उगीच वाऱ्यावरच्या गप्पा कशाला ?

**गोविंद** : आपले धर्मबंधु म्हणायचे नि त्यांचा विटाळ मानायचा ! तेच बाटून खिश्चन किंवा मुसलमान झाले कीं त्यांचा स्पर्श पवित्र वाटतो ! हिंदु धर्मांत राहिल्याबद्दल बिचाऱ्यांना शिक्षा काय, तर भावानें भावाला शिवूं नये ! धर्मांत राहिल्याबद्दल त्यांना शिक्षा व परधर्मांत गेल्याबद्दल बक्षिस ! या धर्माला आणि या न्यायाला काय म्हणायचं ? ही काय माणुसकी ?

**विनायक** : पण महार गाईम्हशींचं, मेलेल्या जनावरांचं मांस खातात.

**गोविंद** : ते बिचारे मेलेल्या जनावरांचं मांस खातात आणि ख्रिश्चन-मुसलमान जिवंत जनावरं कापून त्यांचं मांस खातात. आतां तुम्हीच पहा, हे अपवित्र कसे नि ते पवित्र कसे ?

**नारायण** : लग्नासारख्या अत्यंत मंगलप्रसंगीं आलेल्या वाजंत्र्यांचीच गोष्ट घ्या. महार हिंदू बंधु म्हणून त्यांना उकीरड्यावर जागा दाखवायची आणि परधर्मी मुसलमान-वाजंत्रीवाले खुशाल ओटीवर बसावयाचे ! ख्रिश्चन बँडवाले मोठ्या ऐटीत बांकाखुर्च्यांवर बसतात ! हीच आमची समता ! हीच आमची बंधुता ! हाच आमचा श्रेष्ठ धर्म ! कुत्र्या मांजरांना जो हक्क आहे, तोही माणसांना नसावा ?

**बाबासाहेब** : काय ? माणसांना आम्ही कुत्र्या मांजराहून कमी लेखतो ?

**नारायण** : मेलेल्या जनावरांचं मांस खातो म्हणून महार अस्पृश्य; पण त्याच जनावरांचं मांस खाणारा, त्याच जनावरांचीं हाडं चघळणारा त्याच महाराचा कुत्रा आम्हाला शिवला तरी चालतो ! तो पवित्र नि त्याचा धनी मात्र अपवित्र ! त्याचा स्पर्शहि चालत नाहीं !

**गोविंद** : महाराचा स्पर्श कुठला, नुसती सावली पडली तरी आमचा धर्म बाटतो. आणि त्याचं तें हाडं चघळणारं कुत्रं खुर्चीवर बसलं तरी तें मात्र चालतं !

**नारायण** : महाराच्या घरांतून त्याच्या मांसाचे पदार्थ खाऊन विटाळलेलं अस्पृश्याच्या घरचं मांजर खुशाल तुमच्या पवित्र ब्राह्मणाच्या घरांत शिरून दुधांत तोंड घालूं द्या, तुम्ही सोवळ्यानं जेवीत असूं द्या, तुम्हाला तें शिवलं, तुमच्या देवाच्या पुढ्यांतील नैवेद्य चाटून गेलं, तरी तुम्ही बाटत नाहीं, तुमचा देव रागावत

नाहीं. तुमचा धर्म कुठं समुद्रांत जाऊन बुडत नाहीं कीं तुमची पवित्र ब्राह्मणांची जात नष्ट होऊं शकत नाहीं ! ही काय माणूसकी ? हा काय मनुष्य धर्म ? सारा आपमतलबी-पणाचा बाजार ! देवानं केलेला नव्हे हा धर्म ! सारं माणसाचं ढोंग आहे ढोंग !

## : गाणें :

**आत्मवंचना गमे मज खरी ॥ ध्रु० ॥**
**धर्म लया हा जाई खरोखरी ॥**
**मनुजाहुनि जो पशूस मानी ॥ १ ॥**
**खरा धर्म तो भेद न मानी ।**
**किती आरडूं आणिक कानीं ॥ २ ॥**
**सोडा दृष्टि ही जीर्ण मतांची ।**
**शल्य हेंच मज निशिदिनिं जाची ॥ ३ ॥**

**विनायक** : पाहिलंत बाबासाहेब, हे आपल्या अण्णासाहेबांचे सोबती कसे चुरुचुरू बोलताहेत ? ऐकतील काय हे आपणाला बोलायला ? अरे बाबा, पवित्र ब्राह्मण, पवित्र ब्राह्मण काय म्हणतोस ? बाबासाहेबांचं घराणं फार पवित्र आहे. ते श्रेष्ठ जातींत जन्मले आहेत.

**गोविंद** : होय, आम्ही तेंच म्हणतों. श्रेष्ठ कनिष्ठ जात हा भेदभावच नाहींसा झाला पाहिजे. जातीयता नष्ट झाली पाहिजे.

**नारायण** : एखाद्या जातींत जन्माला आला कीं तो झाला पवित्र ! मग तो ब्राह्मण कितीहि भ्रष्ट झालेला असेना ! उलट यांनीं कमी गणलेल्या महार मांगाच्या जातींत बिचारा एखादा पवित्र विद्वान चोखामेळा अगर आंबेडकर जन्माला आला असला

तरी तो अपवित्र, नीच, कमी, हल्का. ही असली जातीयता नष्ट केली पाहिजे. हे जातीयतेचे बंद तटातट तोडून टाकले पाहिजेत. तरच राष्ट्राचा उद्धार होईल.

**बाबासाहेब** : कां ? जातपात तुला नको आहे ? तूं कोणत्या जातीचा आहेस ?

**नारायण** : मी ? मी मनुष्य जातीचा. जगांत जाती दोन. मनुष्य आणि पशु. मी चार पायांचा पशु नाहीं. दोन पायांचा मनुष्य आहें.

**विनायक** : पण तूं कोणाचा कोण ? तुझं आडनांव काय ?

**नारायण** : मला आडांत पडायचं नाहीं नि नावेनं तरूनहि जायचं नाहीं. मी श्रेष्ठ कनिष्ठ मानीत नाहीं. जातिभेद हें ढोंग आहे. नसते उच्चनीचतेचे बांध घालून ठेविले आहेत आम्ही माणसांनीं. ते सारे नाहींसे झालेच पाहिजेत. मी जात मानीत नाहीं नि आडनांवालाहि महत्व देत नाहीं. मानव धर्म तेवढा मानतों मी.

**विनायक** : बरं तुझं एक राहूं दे. पण तूं तरी आपलं नांव, आडनांव सांगशील का ?

**गोविंद** : हो, न सांगायला काय झालं ? माझं सबंध नांव गोविंद हरी जाधव. आणखी काय सांगूं ?

**बाबासाहेब** : कुठल्या गांवचा तूं ?

**गोविंद** : लांबचा, तिकडचा सारंगखेडचा.

**विनायक** : जाधव म्हणजे मराठा वाटतं ?

**नारायण** : ( हंसत ) अहो मराठा म्हणून काय विचारतां ? शिवाजीचे आजे लखूजी जाधव नि मराठ्यांचे महापराक्रमी सेनापति

धनाजी जाधव यांच्या थेट वंशांतला हा जाधव आहे जाधव ! समजलं बाबासाहेब ?

**बाबासाहेब :** आहे, आहे. मराठ्याचं पाणी दिसतं खरं खरं याच्या अंगांत !

**विनायक :** बाबासाहेब, उगीच एवढी हुषारी नि चुणचुणीतपणा दिसायचा नाहीं. तो जातीचा गुणच दिसतो.

**नारायण :** जातीचा गुण म्हणून काय विचारतां ? चोखामेळ्याच्या नि आंबेडकरांच्या वंशांतील हुषारी नि विद्वत्ता आली आहे पुरेपूर याच्या आंगांत !

**बाबासाहेब :** म्हणजे ?

**गोविंद :** म्हणजे काय ? तुमच्या आजकालच्या जातीयतेच्या मापानं मोजायचं झाल्यास मी महार आहे महार !

**विनायक :** ( एकदम घावराघुबरा झाल्याप्रमाणें ) अहो बाबासाहेब, भ्रष्टाकार ! भ्रष्टाकार !

**बाबासाहेब :** ( रागान ) अरे म्हारड्या, बेधडक माझ्या घरांत शिरलास ? बैठकीवर बसलास ? माझं पवित्र ब्राह्मणाचं घर विटाळून टाकलंस ! हो आधीं घराबाहेर नि तूंहि त्याच्या सोबत्या ! त्यानं जात तरी सांगितली ; पण तूं तीहि सांगायला तयार नाहींस.

**विनायक :** व्हा, व्हा आधीं घराबाहेर. पाहिलांत बाबासाहेब ? अण्णासाहेबांनीं या पोरट्यांना अगदीं डोक्यावर चढवून ठेवलं आहे !

**बाबासाहेब :** आणि हेच परवां आमच्या वाड्यांत यायचे ?

**विनायक :** होय हो बाबासाहेब. सारा भ्रष्टाकार करून सोडला या चहाटळ पोरट्यांनीं ! कसली देशभक्ति नि कसलं काय ?

**बाबासाहेब** : छे छे ! असला धर्मभ्रष्ट आचार मला बिलकुल खपणार नाहीं. मनुष्यानं आपली पायरी पाहूनच चाललं पाहिजे.

**विनायक** : उगीच जातीची उच्चनीचता केली नाहीं देवानं !

**नारायण** : उच्चनीचता आणि जातीचा बुजबुजाट तुमच्यासारख्या भोंदूनीं नि स्वार्थसाधूनीं केला आहे. देवानं नाहीं केला.

**बाबासाहेब** : हाकलून द्या या म्हारड्या चांभारड्यांना ! नीच ते नीच नि गप्पा मारतात बड्या मोठ्या ! चला, चालते व्हा आधीं इथून, नाहींतर धक्के मारून घालवून द्यायला लावीन ! ( ओरडून ) कोण आहे रे तिकडे ?

**गोविंद व नारायण** : बाबासाहेब, एवढी तसदी घेण्याचं कारण नाहीं. हे चाललोंच आम्ही. ( दोघेहि एकामागून एक जातात. )

**बाबासाहेब** : छे छे ! कांहीं सुमारच राहिला नाहीं !

**विनायक** : कलियुगच आहे हें बाबासाहेब !

**बाबासाहेब** : कलियुग असो नाहींतर सत्ययुग असो, माझ्या वाड्यांत खुद्द माझ्या डोळ्यांसमोर मी असला भ्रष्टाकार चालूं देणार नाहीं. अण्णाचे हे सारे थेर बंद केलेच पाहिजेत.

**विनायक** : हो हो, बंद केलेच पाहिजेत. भलतंच कांहींतरी ?

**बाबासाहेब** : या साऱ्या बैठकी नि कपडे आतांच्या आतां परटाकडे धुवायला द्या आणि रामभटजींना बोलावून गोमूत्र शिंपडून वाड्याची शुद्धी करून टाका. जास्त कमी खर्च झाला तरी चालेल; पण धर्म राखला पाहिजे, धर्म !

**विनायक** : आतांच बोलावतों त्यांना.

**बाबासाहेब** : आणि ऐकलं का विनायकराव ?

**विनायक** : हो हो !

**बाबासाहेब** : हो हो काय ? अण्णाला म्हणावं माझ्या वाड्यांत असले थेर चालणार नाहींत. असलीं बंडं मी चालूं देणार नाहीं, ज्यानं त्यानं आपल्या पायरीनंच वागलं पाहिजे. तुला पाहिजे तर फराळ दे म्हणावं महारचांभारांना, घेडाभंग्यांना, ख्रिश्चन मुसलमानांना; पण ते एका पंक्तीला बसतां नयेत. फार तर वाड्याबाहेरच्या बागेंत बसव त्यांना; पण उच्चनीचता, आपला धर्म, आपले आचार-विचार, सारे पाळले पाहिजेत.

**विनायक** : हो हो पाळलेच पाहिजेत, नाहीं तर काय ? भलताच अनर्थ ओढवायचा !

[ गजाभाऊ गोडबोले येतो. ]

**गजा** : अ अ अण्णासाहेब आहेत का हो घरीं ?

**विनायक** : कोण रे तूं ?

**गजा** : म म मी गोडभाऊ ग ग गजाबोले.

**बाबासाहेब** : ( हंसून ) कोण रे गोडभाऊ कीं गोडखाऊ ? नीट बोल की ! असा काय गडबडतोस ?

**विनायक** : कशाला रे तुला पाहिजेत अण्णासाहेब ?

**गजा** : स स सहभोजनाचा ब ब बेत—

**विनायक** : काय रे ? या तुमच्या सहभोजनांत साऱ्या जाती यायच्या का ? महार चांभार घेड भंगी सुद्धां ?

**गजा** : ह ह होय म म महार च च च-चांभार आ आ आम्ही स स स सारे—

**बाबासाहेब** : ( रागानें दरडावून ) काय रे ? तुम्ही सारे महार चांभार ?

**गजा** : न न न नव्हे ब ब ब बाबासाहेब आ आ आ म्ही स स स सारे भ भ भ भाऊ !

**बाबासाहेब** : ( काठी उगारून मारायला जातात आणि वेडावून ) काय म्हणे आम्ही सारे भाऊ भाऊ !

**गजा** : म म म मेलों ऽऽ! ( पळून जातो )

**बाबासाहेब** : पाहिलंत विनायकराव कशीं पोरं फाजील झालीं आहेत ?

**विनायक** : हो हो ! फारच फाजील !

**बाबासाहेब** : अण्णाला म्हणावं, अगदीं बाबासाहेबांच्या मताप्रमाणंच वागलं पाहिजे या घरीं. अगदीं सणसणीत बजावा.

**विनायक** : ( ऐटींत ) अगदीं अगदीं सणसणीत बजावतों.

**बाबासाहेब** : आणि म्हणावं तसं वागायचं नाहीं तर व्हा चालते !

**विनायक** : ( हातवारे करीत ) नाहीं तर व्हा चालते !

( पडदा पडतो )



# अंक दुसरा

[ मानसिंगराव माने यांचें घर. एका खोलींत मानसिंग, अबदुल्ला व पीटर बोलत बसले आहेत. इतक्यांत टेबलावरील वर्तमान-पत्राकडे अबदुल्लाचें लक्ष जातें. तो अंक हातांत घेऊन— ]

**अबदुल्ला** : काय रे मानसिंग, तुमची दिवाळी कधीं ?

**मानसिंग** : परवां.

**पीटर** : कां बुवा, हिंदूंच्या दिवाळीचीशी तुला एवढी उत्सुकता ?

**अबदुल्ला** : नाहीं रे ! दिवाळी अंक पुष्कळसे येतात ना ? ते पाहाण्या-वाचण्याची उत्सुकता. तुला काय वाटलं ?

**पीटर** : मला वाटलं दिवाळीचा फराळ-बिराळ कुठं मिळायचा आहे म्हणून दिवाळीची चौकशी करीत आहेस तूं !

**मानसिंग** : अरे हो, बरी आठवण झाली. अण्णासाहेब परवां दिवाळीनिमित्त आपल्या सर्व मित्रांना आपल्या वाड्यांत देणार आहेत फराळ.

[ गजाभाऊ गोडबोले येतात. ]

**गजा** : क क क कसला रे फ फ फ फराळ ? म म म मला नाहीं ?

**अबदुल्ला** : हा पहा फराळाची चौकशी करीत येत आहे !

**मानसिंग** : यावें यावें गजाभाऊ.

**पीटर** : ( चेष्टेनें ) गजाभाऊ गोडभाऊ कीं गोडखाऊ ? ( वेडावून ) क क कायरे मग गजा ?

**गजा** : ( रागावून ) म म म माझी म म मस्करीच क क क करणार त त त हा हा हा मी च च चाललों प प पहा ! ( जाऊं लागतो )

**मानसिंग** : ( झटपट त्याच्याजवळ जाऊन त्याच्या हातास धरून पीटर व अबदुल्लास ) अशी थट्टा करूं नका ह्याची. ( गजास ) असें काय गजाभाऊ आम्ही सारे भाऊ भाऊ ना ?

**गजा** : त त तर भ भ भाऊभाऊ म्ह म्ह म्हणायचं आ आ आणि त त त त्याची टी टी टी टिंगल करायची !

[ अबदुल्ला पीटर एकमेकांना खुणावतात व तोंड दाबून हसूं लागतात. गजा पुन्हा चिडतो. मानसिंग दोघांना गप्प रहाण्याची खूण करतो व गजाला खुर्चीवर आणून बसवितो. ]

**मानसिंग** : (विषय बदलण्याच्या हेतूनें) बरं पुढं काय सांगत होतास अबदुल्ला ?

**अबदुल्ला** : नको रे बुवा तो फराळ आणि खाणें-पिणें ! तें वरून खायला टाकणं, दूर उकिरड्यावर बसवणं, वरून पाणी घालणं आणि शिवशील, शिवशील, म्हणून ओरडणं ! इतका अपमान नि उपमर्द वाटतो त्यांत कीं नको तें खाणं नि नको तिथं जाणं !

**मानसिंग** : छे रे ! सर्वांचं सहभोजन घडवून आणण्याचा बेत आहे अण्णासाहेबांचा.

**गजा** : स स स सहभोजनाचं न न नांव क क क काढतांच म म म म्हातारा म म मला क क क काठी घ घ घ घेऊन म म मारायला अ अ आला !

**पीटर** : मग काय केलंस तूं ?

**मानसिंग** : मारलं कीं काय तुला ?

**गजा** : न न नाहीं मी प प पळालो त त त तिथून !

**पीटर** : पाहिलंत ? उगीच तिथं जाऊन अपमान करून घ्यायचा. तिथं जाणं मला मुळींच पसंत नाहीं.

**अबदुल्ला** : मलाहि पण तसंच वाटतं. एकदां मी अण्णासाहेबांच्या घरीं गेलों होतों. तो घरीं नव्हता. मला अतिशय तहान लागली होती, म्हणून मी प्यायला पाणी मागितलं. त्याच्या थेरड्या कारभाऱ्यानं

घरांत जाऊन बाहेर येऊन म्हटलं, "आमचा नोकर बाहेर पाणी घेऊन आला आहे तें पी." मी बाहेर येऊन पहातों तो गड्यानं माझ्या हातांत करवंटी दिली आणि 'हें घे पाणी' असं म्हटलं. त्या करवंटींतून पाणी पिण्याचं नाकारतांच तो म्हणाला, "दोन हातांची ओंजळ कर मी तुला वरून पाणी ओततों. मात्र जपून घे हं! पाणी उडवूं नको माझ्या अंगावर!" मला हें सारं इतकं अपमानकारक आणि हीन मनोवृत्तीचं वाटलं कीं, त्या तिडकीसरसा पाणी न पितां मी तसाच निघून आलों.

**मानसिंग** : मलाहि थोडासा असाच अनुभव आला. मी एकदां अण्णासाहेबांकडे गेलों होतों. त्याच्याबरोबर मलाहि चहा लाडू मिळाला. आम्ही दोघांनीं बरोबर चहा घेतला. चहा घेतल्यानंतर अण्णा माडीवर कसलंसं पुस्तक आणायला गेला. मी त्याची वाट पहात तिथंच बसलों. इतक्यांत बाबासाहेबांनीं आचाऱ्यास बजावलं, "अण्णाच्या कपबशीजवळ जी दुसरी कपबशी आहे, ती त्या मराठ्या मुलाची आहे हां. तिचा तुला विटाळ होईल. कामकरणीला बोलाव आणि ती तिला घासायला लाव. घासल्यावर उपडी घालायला लाव नि मग पाणी शिंपडून घरांत आण. नाहींतर वेंधळ्यासारखा करशील सारा विटाळ!"

**पीटर** : म्हणजे तुझ्या स्पर्शानें ती कपबशी बाटलीच म्हणायची!

**अबदुल्ला** : आणि हें सारं बोलणं तुझ्या समक्षच झालं?

**मानसिंग** : नाहीं. मला ऐकूं येईल असं त्यांना वाटलं नसावं. पण तें सारं माझ्या कानीं पडलं. असा राग आला होता कीं ती कपबशी फोडूनच टाकावी!

**पीटर** : बरोबरच आहे. तूं नांवाचा मानसिंग आहेस आणि आडनांवाचा माने आहेस?

अबदुल्ला : मग काय रे ती फोडालीस कां नाहींस ?

मानसिंग : खरोखर फोडणारच होतों. इतक्यांत मोलकरणीनं उचलून नेल्या दोन्ही कपबशा.

पीटर : काय या सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पना नि उच्चनीचतेचे विचार !

राजा : अ अ अ आणि म्ह म्ह म्हणे अ अ आम्ही स स सारे भ भ भाऊ भाऊ !

अबदुल्ला : हे रे कसले भाऊ भाऊ !

मानसिंग : उत्तर हिंदुस्थानांत स्पर्श झालेलीं भांडीं खरोखरच फोडून टाकतात !

अबदुला : आमच्यासारख्या परधर्मी लोकांचीं असतील ?

मानसिंग : छे रे ! स्वधर्मी लोकांचीं ! हिंदु-हिंदूंचीं ! समज, मला दूध प्यायचं असलं अगर चहा प्यायचा असला, तर तें पेय घालून भांडं मिळायचं नाहीं, इकडच्यासारखं. एक मातीचं लोटकं देतील तें पेय घालून. दूध किंवा चहा पिऊन झाला कीं तें भांडं बाटलं ! मग तें भांडं खरोखरच आपटून टाकायचं ! तिकडे उच्चनीचतेच्या नि सोवळ्या-ओवळ्याच्या इतक्या कल्पना पसरल्या आहेत कीं, 'बारा पुरभय्ये आणि तेरा चुली' अशी म्हणच पडली आहे !

पीटर : आमच्या ख्रिश्चनांत असला जेवणाखाण्यांत सोवळ्याचा नि जाती-पातीचा उच्चनीचपणा नाहीं. सारे एका पंक्तीला बसून जेवतों आम्ही.

अबदुल्ला : तुम्ही तरी एका पंक्तीला बसतां; पण आम्ही एका ताटांत जेवूं शकतों. त्यांत आम्हांला उच्चनीचपणा वाटत नाहीं.

मानसिंग : आमच्या हिंदूंत या उच्चनीचतेच्या नि सोवळ्या-ओवळ्याच्या कल्पना इतक्या रोमरोमीं भिनून गेल्या आहेत कीं, सांगतां सोय

[ इतक्यांत अण्णासाहेब येतो ]

**अण्णासाहेब** : कसले बुवा मुष्टिमोदक चालले आहेत ? कुणाला मुष्टिमोद द्यायचा बेत चालला आहे आज ?

**गोविंद** : दुसऱ्याला द्यायचे नाहींत . आम्हांलाच खावे लागणार आहेत ते.

**अण्णासाहेब** : काय ? आम्हाला ? नि ते कोण देणार ?

**नारायण** : आपल्याच घरीं मिळायचे आहेत महाराज !

**अण्णासाहेब** : काय रे थट्टा करतोस माझी ?

**मानसिंग** : थट्टा नाहीं, खराच प्रकार आहे महाराज ! नुकतेच हे दो तुझ्या घरीं जाऊन आले. तिथ कांहीं उडाली आहे म्हाताऱ्या चकमक ! तीच हकीकत सांगत होते हे. इतक्यांत तूं आलास मी त्यांना सांगत होतों, "परवां दिवाळीला तुझ्या वाड्यां फराळाला जायचं आहे" म्हणून ! त्यांत निघाली मुष्टि मोदकांची गोष्ट !

**अण्णासाहेब** : ( घाबऱ्या घाबऱ्या ) काय ? काय झालं आमच्या घरीं कोण काय बोललं कीं काय तुम्हाला ?

**नारायण** : नुसतं बोललं नाहीं. धक्के खाण्याचाच प्रसंग ओढवला होत पण तो टळला.

**गजा** : म म मला म म मार ख ख खाण्याची प प पाळी अ अ आल ह ह होती !

**मानसिंग** : सहभोजनाचं नांव काढतांच बाबासाहेब रागानं काठी उगारू याच्या अंगावर धांवले तसा हा पळाला.

**अण्णासाहेब** : बरं आणखी काय काय झालं ?

**गोविंद** : ( त्वेषानें ) व्हायचं काय ? नेहमींची आमच्या जातीची अस्पृश्यत आडवी आली. जिथं जावं तिथं हा उच्चनीचपणा आड

येतो. कुत्र्या-मांजरांना, मांजऱ्या-उंदरांना जी अस्पृश्यता नाहीं, ती आम्हा माणसांना फार त्रासदायक होते, अण्णासाहेब अहो ! या जातींत, या धर्मांत जन्माला येऊन माणुसकीलाही पारखी होणारी ही अस्पृश्यता भोगण्यापेक्षां आम्ही कुत्र्या-मांजरांच्या जन्माला आलों असतों तर बरें झालें असतें !

**णासाहेब** : नको रे गोविंदा ! असे उद्गार काढूं नको ! ( कळवळ्यानें ) माझ्या हृददयाला बोचतात हे ! माझ्या घरीं तुझा कांहीं अपमान झाला असेल, तर त्याबद्दल मी क्षमा मागतों तुझी. ( हात जोडतो )

**विंद** : अण्णासाहेब, मी काय तुमचं वर्तन पहात नाहीं ? तुमच्यासारखे उच्चनीच वृत्तीला गाडणारे, जातिभेद, धर्मभेद मोडणारे सारेच लोक तयार होतील तर आमची अस्पृश्यता क्षणभरही टिकणार नाहीं नि आपल्या देशाचा उद्धार झाल्यावांचून रहाणार नाहीं !

**ा** : पपपण सससगळ्यांना पपपटेल तततेव्हां ना ?

**सिंग** : ही जातीयता, हा उच्चनीचपणा आपल्या लोकांच्या रोमरोमांत भिनून गेला आहे !

**णासाहेब** : हजारों वर्षांचे संस्कार एकदम कसे नाहींसे होतील ? त्यांतून तुमच्याआमच्यासारख्या तरुणांची गोष्ट निराळी. जुन्या माणसांना आमचे विचार पटत नाहींत.

**ायण** : तीं जुनीं म्हातारी खोडं ऐकायचींच नाहींत. त्यांना आपला हेका चालवायचा असतो. आपलं तेंच बरोबर; जुनं तेंच सोनं असं वाटतं त्यांना. त्यांना सांगितलं पाहिजे;

लेखतात ! उलट अस्सल पोर्तुगीज यांना जवळ घ्यायलाहि तयार नसतात !

**गोविंद :** छान ! असंच पाहिजे ! खालच्यांना लाथा द्यायच्या आणि वरच्यांच्या लाथा घ्यायच्या !

**पीटर :** इकडचे बाटलेले सारस्वत म्हणजे बामण ख्रिश्चन हे आपणाला श्रेष्ठ मानतात. गावडे, भंडारी वगैरे ख्रिश्चन जातीशीं प्राण गेला तरी सोयरिक संबंध करायचे नाहींत ! तसा एखादा संबंध झाला तर यांचा प्राण गेलाच !

**नारायण :** कायरे पीटर, तुमच्यांत म्हणे मेलेलं माणूस पुरण्यांतहि भेदभाव असतो ?

**पीटर :** होय तर ! मेलेल्या माणसाची हाडं देवळांत पुरायची ! जास्त पैसे देईल त्याची देवाच्या अगदीं नजीक ! जितके कमी पैसे अस-तील तितकी लांब लांब. नी मुळींच पैसे न देणाऱ्यांची द्यावयाचीं विहिरींत फेकून !

## : गाणें :

( चाल–या दुनियेच्या बाजारामधिं )

**धनिकांनीं बाजार मांडिला देवाधर्माचा ।**
**खरोखर देवाधर्माचा ॥ धृ० ॥**

**यासाठीं ना येसु गेला**
**अमर जाहला तरीहि आजला**
**अमिरी, गरीबी भेदाभेदहि नष्ट नसे झाला ।**
**खरोखर नष्ट नसे झाला ॥ १ ॥**

**समानता ती आणूं आतां**
**वागे जैसी प्रेमळ माता**
**आपण सारे एक होउनी निर्मूं नवजगता ।**
**खरोखर निर्मूं नवजगता ॥ २ ॥**

**मानसिंग** : मग तो स्वर्गांत पोंचत नाहीं वाटतं ?

**गजा** : ज ज जात अ अ असेल न न नरकांत !

**पीटर** : त्यांनीं नांवं, आडनांवं ख्रिश्चन लोकांची घेतलीं आहेत; पण देशी ख्रिश्चन येशूच्या कळपांतील कोंकरें आमचे भाऊबंद आहेत. त्यांत त्यांच्या ख्रिस्ती धर्माच्या स्वीकारामुळं जरी त्यांची अस्पृश्यता गेली असली, तरी उच्चनीचता कुठं गेली आहे ? बाटलेले ब्राह्मण बाटलेल्याच ब्राह्मण घराण्यांतील मुलगी पहातील. गोऱ्या कातडीचे साहेब श्रेष्ठ ते श्रेष्ठ. हे सारे बाटगे त्यांचे गुलाम !

**अण्णासाहेब** : एकंदरींत काय ? घरोघर मातीच्याच चुली ! जातिभेद कांहीं मोडत नाहीं !

**गजा** : क क कोण म म मोडणार हा भ भ भेदाभेद ?

**नारायण** : जातिभेद मोडण्यासाठीं ब्राह्म समाज, प्रार्थना समाज निघाले; तिथंही रड तीच ! ही मंडळी फार तर सुशिक्षित नि उच्च विचारांची मानली जाते; पण त्यांनाहि हा भेदभाव मोडवत नाहीं !

**मानसिंग** : कुलाचा अभिमान, जातीचा अभिमान, साऱ्या कोरड्या गप्पा-गोष्टी. त्यांत या जुन्या लोकांचा अभिमान उताला जातो. आमची मराठा जात, तिच्यांतहि उच्च मराठे नीच मराठे. आमचे वडील किती अभिमानी होते. आमचं मराठ्यांचं अस्सल क्षत्रिय घराणं. आमचा वंश थेट सूर्यवंशापासून उत्पन्न झालेला. रजपूत रक्ताशीं आमचा संबंध. मान कापली तरी बेहत्तर; पण मान लवायची नाहीं असा बाणा.

**अण्णासाहेब** : हा प्रकार मराठ्यांत आहे नि ब्राह्मणांत नाहीं असं वाटतं कीं काय तुला ?

**गजा** : ब ब ब्राह्मण त त तर फ फं फार—

**अबदुल्ला** : काय ? ब्राह्मणांतहि उच्चनीचता मानणारे आहेत ? आम्ही तर समजतों हिंदूंत ब्राह्मण लोक इतरांना कमी लेखतात, आणि आपण उच्चपणा मिरवतात.

**अण्णासाहेब** : छे छे ! चुकीचा आहे तुझा समज अबदुल्ला. ब्राह्मणांतहि शेंकडों नव्हे हजारों जाती आहेत. त्यांतहि उच्चनीचपणा आहे. खाण्यापिण्यावरून झालेल्या जाती, आचारविचारावरून झालेल्या जाती, रहाण्याच्या स्थलावरून झालेल्या जाती, बंगाली मत्स्याहारी ब्राह्मणांस माशांना न शिवणारे महाराष्ट्रीय ब्राह्मण कमी लेखतील.

**नारायण** : इकडचे ब्राह्मण प्राण गेला तरी सारस्वतांना ब्राह्मण म्हणणार नाहींत. दैवज्ञ तर त्यांच्या मतें ब्राह्मणच नव्हेत.

**अण्णासाहेब** : त्या गोष्टी कशाला पाहिजेत ? खुद्द महाराष्ट्रीय ब्राह्मणांतहि उच्चनीचता आहेच. चित्पावन कऱ्हाड्यांना कमी म्हणतील, देशस्थ आमच्यापैकीं नव्हेत म्हणतील, देवरुख्यांना हीन लेखतील तर पळशे ब्राह्मणांना नि ऋग्विदांना कनिष्ठ समजतील ! ब्राह्मण तेवढे एक नव्हेत. त्यांत सोयरिक संबंध होत नाहींत. पोटजातींच एकीकरण होत नाहीं.

**गोविंद** : इतर हिंदू आम्हाला अस्पृश्य लेखतात म्हणून आम्ही ओरडतों; पण आम्ही सात कोटी अस्पृश्य तरी एक कुठं आहोंत ? आमच्यांत पुन्हा स्पृश्यास्पृश्यता आहेच. महार श्रेष्ठ कीं चांभार श्रेष्ठ ? धेड मोठा कीं मांग मोठा ? कुणी कुणाला शिवूं नये ? याच्या रूढी पडून गेल्या आहेत, त्या मोडतां मोडत नाहींत !

**अबदुल्ला :** माझा रत्नागिरी जिल्ह्यांत एक वाणी मित्र आहे—

**गजा :** व व वाण्यांतहि अ अ आहेत भ भ भ भेदाभेद !

**अबदुल्ला :** तो सांगे, कुडाळे व देवरूखे असे आपल्यांतहि भेद आहेत. हे स्थानभेदच असतात.

**मानसिंग :** आमच्या मराठ्यांत अस्सल क्षत्रिय, उच्चनीच, कमीअधिक, पंचकुळी, शाण्णव कुळी, असे प्रकार आहेतच. हे क्षत्रियांतले भेदभाव झाले. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे गीतेंतील चार वर्ण मानले गेले, तरी बरें होईल. पण शिवाजीमहाराजांसारख्या क्षत्रियांना सुद्धां कमी लेखणारे ब्राह्मण होते. कलियुगांत म्हणे ब्राह्मण व शूद्र हे दोनच वर्ण शिल्लक राहिले. क्षत्रिय आणि वैश्य हे दोन नष्ट होऊन गेले !

**गोविंद :** म्हणजे ते सारे मेलेच कीं काय ?

**नारायण :** छे रे ! ते मेले नाहींत. ते दोन्ही वर्ण शूद्र वर्णांत सामील झाले.

**अबदुल्ला :** आणि ब्राह्मण तेवढे वेगळे शिल्लक राहिले !

**गोविंद :** क्षत्रिय कलियुगांत नाहींत तर राणा प्रतापसिंहासारखे रजपूत आणि शिवाजी महाराजांसारखे ब्राह्मणाची शेंडी आणि धर्म राखणारे हे राजे कोण ?

**मानसिंग :** अरे, शिवाजी महाराज शूद्र, तुला ठाऊक नाहीं ? त्यांनीं तलवार गाजविली तरी ते क्षत्रिय नव्हेत. त्यांना राज्याभिषेक करायला महाराष्ट्रीय ब्राह्मण कबूल झाले नाहींत. कारण ते शूद्र, त्यांना राज्याभिषेक कसा करायचा ? म्हणून महाराजांना काशीहून गागाभट्टास आणवावं लागलं नि राज्याभिषेक पार पाडावा लागला !

**नारायण :** जणुं काय सारे महाराष्ट्रांतील ब्राह्मण खलास झाले होते ?

**पीटर** : तरी बरं शिवाजी महाराजांनीं त्यांना मुसलमान होण्याचं वांचविलं होतं.

**अण्णासाहेब** : ब्राह्मणांत ब्राह्मणत्व तेवढं शिल्लक रहातं. कलियुगांत बाकी सारे शूद्र ठरतात. ब्राह्मणाचा आचारविचार कसाहि असेना, त्याचं श्रेष्ठत्व कमी होत नाहीं.

**गोविंद** : 'जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट, तरी तो तिन्ही लोकीं श्रेष्ठ' असं वचन आहे ना ?

**नारायण** : सारा स्वार्थाचा बाजार ! आपलं श्रेष्ठत्व मिरविणारीं खोटींनाटीं वचनं आपणच तयार करायचीं नि तीं ग्रंथांत घुसडून द्यायचीं !

**अबदुल्ला** : कुणीकडून तरी आपलं श्रेष्ठत्व मिरवायचं झालं !

**पीटर** : क्षत्रियांना असं कांहीं करतां येत नव्हतं वाटतं !

**नारायण** : ते खरोखर क्षत्रियांचं कर्तव्य बजावीत होते. ब्राह्मणांचं संरक्षण करीत होते, तरी कलियुगांत क्षत्रिय औषधालाहि शिल्लक नाहीं म्हणून शिवाजीला महाराष्ट्रांतील ब्राह्मणांनीं शूद्र ठरविलं !

**गोविंद** : खालच्या घराचे वांसे मोजण्याचा धंदा म्हणायचा हा !

**अबदुल्ला** : पण ते क्षत्रिय झाले काय ?

**मानसिंग** : परशुराम नांवाचा एक ब्राह्मण क्षत्रियाचा पेशा पतकरून साऱ्या क्षत्रियांवर तुटून पडला आणि त्यानं सारी पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा करून एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केली !

**अबदुल्ला** : एकदां पृथ्वी निःक्षत्रिय केल्यावर मग दुसऱ्या खेपेस क्षत्रिय आले कुठले ?

**नारायण** : अरे मेलेले जिवंत झाले असतील अथवा भूमींतून रुजून आले असतील !

**पीटर** : अशी एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय केल्यावर साऱ्या क्षत्रियांचा नायनाट झाला ?

**अण्णासाहेब** : साराच खुळ्यांचा बाजार ! कुठून तरी क्षत्रिय नाहीं म्हणून आपलं श्रेष्ठत्व मिरवायचं !

**मानसिंग** : मी म्हणतों दर वेळीं पृथ्वी निःक्षत्रिय करून कांहीं क्षत्रिय शिल्लक रहात असावे. तेच पुढल्या खेपेस मारले जात असावे. असं एकविसाव्या वेळीं केलं त्यावेळीं सुद्धां कांहीं शिल्लक राहिले असतील; मग कलियुगांत क्षत्रिय नाहीं आणि शिवाजी राजे क्षत्रिय नव्हेत हें ढोंग कशाला ?

**अण्णासाहेब** : आमचं ब्राह्मणांचं स्तोम वाढवायला ! अशाच रीतीनं हीं उच्चनीचतेचीं पाळंमुळं फार खोलवर गेलीं आहेत. तीं समूळ खणून काढलीं पाहिजेत !

**नारायण** : एकदां सगळ्या उंदरांनीं सभा भरवून ठराव पास केला कीं, आपण साऱ्यांनीं मिळून मांजराच्या गळ्यांत घंटा बांधूया, म्हणजे आपलं संरक्षण होईल. पण ती घांट बांधावी कोणी ? हा प्रश्न येतांच सारं ज्ञान लटपटलं, त्यांतलीच ही गोष्ट !

**गोविंद** : कोणतीहि गोष्ट बोलणं सोपं, पण करणं कठीण ! आजवर आपण पुष्कळ बोललों; पण प्रत्यक्ष कृति कोण करणार ?

**अण्णासाहेब** : मी करणार मी ! कोणतीहि सुधारणा करायची असो, तिची सुरवात प्रत्येकानं आपल्या घरापासून केली पाहिजे. घर हाच सुधारणेचा पाया आहे. मी माझ्या घरीं उच्चनीचतेला गाडून आणि समतेला सम्मती देऊन सुरवात करणार आहें प्रत्यक्ष कृतीला.

**पीटर** : ती कशी काय ?

**अण्णासाहेब** : परवां दिवाळी आहे. त्या दिवशीं मी तुम्हा सर्वांना

आपल्या वाड्यांत फराळासाठीं बोलावून सहभोजन करणार आहे सहभोजन.

**नारायण** : ( हंसत ) पण महाराज, आपलं भोजन पोटांत व पाठींत दोन्हीकडे देण्याचा विचार आहे वाटतं ?

**गजा** : ह ह हकालपट्टी न न नाहीं झ झ झाली म्ह म्ह म्हणजे मि मि मिळविलें !

**गोविंद** : बाकी आपल्या वडलांसारख्या सनातनी विचारांच्या म्हाताऱ्याच्या नजरेखालीं सहभोजन न मिळतां मुष्टीमोदक भोजन मात्र यथेच्छ खायला मिळेल अशी खात्री वाटते !

**अण्णासाहेब** : छे छे ! तसं मुळींच होणार नाहीं.

**अबदुल्ला** : तुमच्या वडलांकडून कालत्रयीं होणार नाहीं ही गोष्ट !

**नारायण** : उगाच फंदांत पडू नका अण्णासाहेब.

**मानसिंग** : बोलाचीच कडी बोलाचाच भात असं करायचं !

**अण्णासाहेब** : छे ! नुसत बोलणं पुरं झालं. आतां प्रत्यक्ष कृतीला सुरवात करायची आहे. मग काय वाटेल तें होवो !

**नारायण** : व्हायचं काय ? आम्हा साऱ्यांचीच हकालपट्टी होऊन त्याबरोबर तुलाहि घराबाहेर पडायची पाळी यायची !

**अण्णासाहेब** : आणि खरोखरच पाळी आली, तर घराबाहेर पडायचं असं ठरवलं आहे मी.

**मानसिंग** : शाबास अण्णासाहेब ! एवढी तयारी आहे तुमची ?

**अण्णासाहेब** : तर काय शिळोप्याच्या गप्पाच ! असं तयार झाल्यावांचून आणि कृति केल्यावांचून खरं राष्ट्र बनायच नाहीं. आपण सारे भाऊ भाऊ. आलंच पाहिजे साऱ्यांनीं.

**सारेजण** : हो हो ! येऊं येऊं ! आम्ही सारे भाऊ भाऊ !

[ **अंक दुसरा समाप्त** ]

# अंक तिसरा

[ बाबासाहेबांचा दिवाणखाना. कोचावर बाबासाहेब दिङ्मूढ स्थितींत बसले आहेत. विनायकराव कारकून जवळच उभा आहे. मध्येंच बाबासाहेब उठून इकडे तिकडे बेचैन स्थितींत फेऱ्या घालतात. ]

**बाबासाहेब :** विनायकराव, आज आठ दिवस होऊन गेले; पण अण्णाचा पत्ता नाहीं. चैन पडत नाहीं झोंप येत नाहीं. कांहीं पत्ताच नाहीं लागत का हो ?

**विनायक :** बाबासाहेब, सारखा तपास करतों आहें; पण बिलकूल पत्ताच लागत नाहीं !

**बाबासाहेब :** केवढी चूक केली मी ? एकुलत्या एका मुलाला घरांतून चालता हो म्हणून दिवाळीच्या आनंदाच्या दिवशीं घराबाहेर घालवलं मी ! किती मी दुष्ट ? माझा बाळ कुठं हो असेल ? मला भेटेल का हो ? ( डोळे पुसूं लागतो. )

**विनायक :** उगी रहा बाबासाहेब. तुम्हीच असा धीर सोडल्यावर आम्ही धीर कसा धरणार ? ( आपणहि डोळे पुसूं लागतो )
( इतक्यांत एक पोस्टमन येऊन पत्र देऊन जातो. )

**बाबासाहेब :** विनायकराव, हें पत्र तर अण्णाचं दिसतं. वाचा, वाचा बघूं. माझा चष्मा घरांत राहिला.

**विनायकराव :** हो हो. अण्णासाहेबांचंच पत्र दिसतय् खरं.

**बाबासाहेब :** वाचा वाचा लौकर. माझं मन अगदीं अधीर होऊन गेलं आहे.

**विनायक :** ( पाकीट फोडून वाचूं लागतो. )
तीर्थरूप बाबासाहेब यांचे सेवेसीं, कृ. सा. न. वि. वि. वास्तविक हें पत्रहि आपणाला पाठवूं नये असं मनाला वाटत

होतं; पण आपल्यावरचं प्रेम व माझं पुत्रकर्तव्य मला स्वस्थ बसूं देईना म्हणून हें पत्र मी लिहीत आहे. ऐन दिवाळीच्या दिवशीं आपण मला घरांतून घालवून दिलंत. एकुलता एक मुलगा म्हटलं नाहीं. माझ्या भावनांचा विचार केलात नाहीं. तुमचीं मतं तुम्हाला जेवढीं प्रिय आहेत, त्याहूनहि जास्त माझीं मला प्रिय आहेत. मी तुमचाच मुलगा आहें. तुम्ही आपल्या मतांबद्दल जेवढे आग्रही आहां, त्याहीपेक्षां मी माझ्या मतांबद्दल जास्त आग्रही आहें. जातिभेद मानूं नये, धर्मभेद मानूं नयेत, उच्चनीचता मानूं नये! या उच्चनीचतेनंच आपल्या देशाचं वाटोळं केलं आहे. आम्ही सारे एक आहोंत. बंधु बंधु आहोंत. सारे भेदाभेद नष्ट झालेच पाहिजेत. आपल्या देशाचा तरणोपाय समानतेनं वागण्यांतच आहे असं माझं प्रामाणिक मत आहे. म्हणून मी दिवाळीच्या दिवशीं माझ्या सगळ्या जातींच्या व सर्व धर्मांच्या मित्रांना आपल्या घरीं एकत्र जमवून सहभोजनाचा बेत केला होता. सुधारणेला सुरवात आपल्या घरापासूनच करायची म्हणून मी आगाऊ आपल्या कानावर घालून हें कार्य आरंभिलें होतें; पण आयत्या वेळीं आपला मताभिमान जागृत झाला. तावडतोब मी चालता झालों. ठीक आहे. तुमचा तो वाडा, तुमची इस्टेट नि तुमची तीं मतं हीं सारीं तुम्हीच घेऊन बसा. मला माझ्या घरीं थारा मिळणार नाहीं आणि माझ्या इस्टेटींतून एक दमडीही मिळणार नाहीं हें तुमचं वचन मी शिरसामान्य केलं असून तुमच्या म्हणण्याप्रमाणं मी तोंड घेऊन चालता झालों आहें. तुम्ही माझा तपास करूं नका. मला पुन्हा आपल्या घरीं बोलावूं नका. मात्र ज्या दिवशीं आपण मला माझ्या मताप्रमाणं वागूं देण्यास तयार आहां अशी माझी

खात्री पटेल, त्या दिवशीं मी आपण होऊन आपणाकडे येईन. आपला उपमर्द करावा, आपणास त्रास द्यावा, अशी माझी इच्छा नाहीं. पण माझा नाइलाज आहे. रागावूं नका. क्षमा करा. बहुत काय लिहिणें ही विज्ञापना.

आपला नावडता मुलगा,
अण्णा.

**बाबासाहेब** : ( दुःखानें ) नावडता नाहीं रे बाळ, आवडता ! पण विनायकराव कुठून पत्र आलं आहे हें ?

**विनायक** : ( पत्र नीट पाहून ) पत्रांत मुक्काम अगर पत्ता दिलेलाच नाहीं.

**बाबासाहेब** : बरं पत्रावर छाप कुठला आहे, पहा !

**विनायक** : ( पुन्हा छाप पाहून ) छे ! छाप नीट उठलेला नसल्यामुळें पत्र कुठून आलं हें कळण्यास मार्ग नाहीं.

**बाबासाहेब** : ( चिंतेनें ) काय करावं ? कुठं तपास करावा ? त्याच्या सोबत्यांकडे तपास केला नाहीं काय ?

**विनायक** : केला तर ! त्यांच्या साऱ्या सोबत्यांकडे तपास केला; पण त्यांपैकीं कुणालाच त्यांची माहिती नाहीं.

**बाबासाहेब** : मग आतां उपाय तरी काय करावा ?

**विनायक** : मला एक उपाय सुचला आहे.

**बाबासाहेब** : ( उतावीळपणानें ) सांगा ना लवकर !

**विनायक** : शेजारच्या गांवीं करुणेश्वर मंदिरांत समतानंद नांवाचे कुणी एक साधुपुरूष आले आहेत; त्यांना सन्मानानं आपल्या वाड्यांत आणून ठेवून घ्यावं. त्यांची सेवाशुश्रूषा करावी. त्यांच्या कृपाप्रसादानं तरी आपले अण्णासाहेब भेटतील तर पहावं असं मी ठरवलं आहे. मी काल त्यांना भेटूनहि आलों.

**बाबासाहेब :** अवश्य घेऊन याच त्यांना. कुठले आहेत ते ?

**विनायक :** ते रामकृष्ण मिशनचे साधु आहेत. मोठे विद्वान आहेत. मराठी उत्तम बोलतात. ( दूर पाहून ) ते पहा, ते पहा तेच येताहेत इकडे.

[ इतक्यांत समतानंद येतात. विनायकराव आणि बाबासाहेब त्यांच्या पायां पडायला जातात. साधु त्यांना तसं करूं देत नाहींत. ]

**समतानंद :** छे छे ! माझ्या पायां पडूं नका ! मी कुणी मोठा माणूस नाहीं. मी आपल्यासारखाच एक सामान्य मनुष्य आहे. आपण सारीं एका ईश्वराचीं लेंकरं. आपण सारे समान आहोंत. पायां पडून आपणांत उच्चनीच भेद निर्माण करणें हें गैर आहे. उच्चनीचतेचे भेद सोडून द्या.

**बाबासाहेब :** ( गहिंवरून ) महाराज, माझ्या अण्णाचेच विचार आपण बोललां. दोघांचे विचार कसे अगदीं तंतोतंत जुळतात.

**समतानंद :** कोण अण्णा ?

**विनायक :** यांचे चिरंजीव.

**समतानंद :** कुठं आहेत ते ?

**बाबासाहेब :** काय सांगूं महाराज ? तो रागानं घरांतून निघून गेला.

**विनायक :** ( गहिंवरून डोळे पुशीत ) गेले हो आमचे धाकटे धनीसाहेब, रागानं निघून गेले घरांतून.

**समतानंद :** असं झालं तरी काय त्यांना रागावून निघून जायाला ?

**बाबासाहेब :** मतभेद. मतभिन्नता.

**विनायक :** सांगतों. मी सांगतों सारं. ह्या बाबासाहेबांचे अण्णासाहेब हे एकुलते एक चिरंजीव. आईवेगळं मूल म्हणून बाबासाहेबांनीं त्यांना फार लाडांत वागवलं. घरची श्रीमंती. लाडांत वाढलेले पण गैरवर्तन मुळींच नाहीं हो ! फार फार सुशील आहेत ते. शिकण्यासवरण्यांत त्यांनीं कधीं कसूर केली नाहीं. असा मुलगा हजारांत काय लाखांत मिळणार नाहीं लाखांत. परस्परांचें परस्परांवर प्रेमहि तसंच, पण एका गोष्टींत मात्र बिघडलं.

**समतानंद :** तें कोणत्या ?

**बाबासाहेब :** माझा व त्याचा एका बाबतींत मतभेद झाला. तो नव्या मताचा आणि मी जुन्या मताचा.

**समतानंद :** हें तर सर्वत्र आढळतें. जुन्या नव्याचा झगडा हा रोजच चालू असतो. जुनी पिढी आणि नवी पिढी यांत मतभेद हा नेहमींचा असतोच.

**विनायक :** दिवाळीच्या दिवशीं अण्णासाहेबांनीं आपल्या वाड्यांत सब्रगोलंकार केला, त्याबरोबर बाबासाहेब चिडले ! बाबासाहेब जुन्या मताचे धार्मिक आचरणाचे. त्यांना हा सब्रगोलंकार आवडला नाहीं.

**बाबासाहेब :** अहो यांना स्पृश्यास्पृश्य भेद नाहीं, जात नाहीं, पात नाहीं, धर्म नाहीं, कांहीं नाहीं. उच्च नाहीं, नीच नाहीं. सारी म्हणे समता.

**समतानंद :** बरं पुढं ?

**विनायक :** पुढं काय ? बाबासाहेब चिडले, संतापले आणि साऱ्यांना हाकून दिलं त्यांनीं. आणि मुलाला बजावलं, "माझ्या घरीं असले थेर चालायचे नाहींत तुझे. चालता हो तोंड घेऊन !" त्यांचे सारे

सोबती आणि अण्णासाहेब सारेच निघून गेले. आज आठ दिवस झाले.

**समतानंद :** बाबासाहेब, तुमची जुन्या आचार विचारांवर बरीच श्रद्धा दिसते. त्यापायीं प्रत्यक्ष मुलाला सुद्धां घराबाहेर घालवून देण्यास तुम्ही कमी केलं नाहीं.

**बाबासाहेब :** रागाच्या भरांत जरी मुलाला हाकून दिलं तरीं तो गेल्यापासून माझ्या जिवाला चैन पडत नाहीं. रात्रंदिवस झोंप येत नाहीं. सारखे मुलाचे विचार मनांत घोळत असतात. त्याचं बोलणं, चालणं, वागणं, सारं सारं लक्षांत येऊन खेद होतो. स्वामी महाराज, माझा मुलगा भेटेल का हो ?

**समतानंद :** भेटेल, भेटेल, खात्रीनं भेटेल ! तुम्ही मुळींच कष्टी होऊं नका !

**विनायक :** आपल्यासारख्या सत्पुरुषाच्या आशीर्वादानं काय नाहीं होणार ? साधुमहाराज, हें पाहिलंत त्याचं पत्र, आतांच आलं आहे.

**बाबासाहेब :** हें वाचून पहा म्हणजे सारं कळेल तुम्हाला.

[ पत्र समतानंदांच्या हातीं देतात. ते लक्षपूर्वक गंभीर चेहरा करून वाचतात. मध्यंतरीं वाचतां वाचतां मान हालवितात. ]

**समतानंद :** भेटेल. तुमचा मुलगा खात्रीनं भेटेल तुम्हाला. या पत्रांतच भेटण्याचं अश्वासन दिलं आहे त्यानं.

**बाबासाहेब :** कुठं आहे आश्वासन ?

**समतानंद :** हें पहा या पत्रांतच लिहिलं आहे, "आपली मतं ज्या दिवशीं बदलतील, त्या दिवशीं मी आपण होऊन आपणास येऊन भेटेन." म्हणजे आपलीं मतं बदलावीं अशी त्यांची इच्छा दिसते.

**विनायक :** पण साधुमहाराज, बाबासाहेबांना तरी त्यांचीं सबगोलंकारी मतं कशीं पटावीं ? ते पडले धर्माभिमानी.

**समतानंद :** आपला धर्म फार उदार आहे. खऱ्या धर्मानं चालणाराला त्यांत पुष्कळ वाव आहे. त्यांत कितीतरी गोष्टी अशा आहेत कीं, त्या आजहि सुधारणेच्या वाटतील. आणि देशकालवर्तमानाप्रमाणं धर्मांत आणि आचाराविचारांत बदल केला पाहिजे.

**बाबासाहेब :** त्याचीं कांहीं मतं मीहि मान्य केली; पण त्याचा तो सबगोलंकार माझ्यानं पहावेना.

**समतानंद :** 'सबगोलंकार', 'सबगोलंकार' असं मघांपासून मी तुम्हां दोघांच्याहि तोंडून ऐकतों आहें. असं काय केलं त्यांनीं ?

**विनायक :** सगळया जातीचीं माणसं त्यांनीं एकत्र केलीं आणि मांडीला मांडी ठोकून सारे जेवायला बसले. हें बाबासाहेबांच्या दृष्टीस पडतांच त्यांचं पित्त भडकलं !

**बाबासाहेब :** अहो, निरनिराळ्या जातीचींच नव्हे, तर स्पृश्य अस्पृश्य, हिंदु, मुसलमान, खिश्चन सारे एका पंक्तीला ! मग मला काय वाटेल ? आपण धर्म जाणतां. आपणच सांगा बरं हें योग्य काय ?

**समतानंद :** बाबासाहेब, तुम्ही कधीं मुंबई कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरीं गेलां होतां काय ?

**बाबासाहेब :** गेलों आहें बरेच वेळां.

**समतानंद :** तिथें कधीं खाणावळींत जेवणाचा प्रसंग आला आहे आपणाला ?

**बाबासाहेब** : पुष्कळदां.

**समतानंद** : तिथं जेवतांना आपल्या पंक्तीस कोणकोणत्या जातीचीं माणसं बसलीं आहेत याचा कधीं तपास केला होता आपण ?

**विनायक** : पहिल्या खेपेस असं विचारण्याचा प्रसंग आला होता मजवर. मी होतों बाबासाहेबांच्या बरोबर. गेलों दोघे ब्राह्मण-भोजन-गृहांत. आमच्या गांवाकडचे कांहीं खालच्या जातीचे लोक त्या खाणावळींत जाऊन बाहेर पडलेले व कांहीं लोक आम्ही बसायच्या पंक्तीस बसलेले पाहून मी मालकास विचारलं.

**समतानंद** : मग काय मिळालं उत्तर आपणांस ?

**विनायक** : मालक हंसून म्हणाले, "कुठल्या हो गांवचे सोवळे भटजी ! नव्यानच मुंबईत आलेले दिसतां. इथं जातपात विचारायची नाहीं. हवं असेल तर इथं सर्वांबरोबर बसून जेवावं, नाहीं तर आल्या वाटेनं चालतं व्हावं !"

**समतानंद** : (हंसून) मग काय केलंत बाबासाहेब ?

**बाबासाहेब** : मग काय ? गेलों दुसऱ्या खाणावळींत !

**समतानंद** : मग तिथं तरी ब्राह्मणी सोवळं ओवळं होतं ?

**बाबासाहेब** : छे हो ! कुठलं सोवळं ओवळं ! पहिल्याच खाणावळीची दुसरी आवृत्ति.

**विनायक** : आणि तसंच उत्तर. मग गेलों तिसऱ्या खाणावळींत.

**समतानंद** : मग तिथं झाली वाटतं मनासारखी सोय ?

**बाबासाहेब :** सोय कुठली कपाळाची ? आम्ही विचारायचं सोडलं आणि आपद्धर्म म्हणून गुपचिप जेवलों झालों तिथं !

**समतानंद :** ( हंसून ) मग तुमचा धर्म बुडाला नाहीं तिथं ?

**विनायक :** वाः वाः ! बाबासाहेबांनीं आल्यानंतर प्रायश्चित घेतलं आणि ते शुद्ध झाले !

**समतानंद :** असं प्रत्येक वेळीं केलं तुम्ही बाबासाहेब !

**बाबासाहेब :** छे हो ! नेहमी कुठलं घ्यायचं प्रायश्चित !

**समतानंद :** म्हणजे तुम्हीहि सबगोलंकारी आहांत म्हणायचे ? मुलासारखे तुम्हीहि सार्‍या जातींबरोबर जेवलां.

**बाबासाहेब :** ती परगांवची खाणावळींतली गोष्ट ! म्हणून तसं घरांत कोण करूं देईल कीं काय ? अठरापगड जात घरीं एकत्र करायची ?

**समतानंद :** तुमच्यापुढं एक पाऊल तुमचे चिरंजीव गेले, यांत काय बिघडलं बरं ? दुसरी गोष्ट तुम्हाला विचारतों. तुम्हाला आपला जुना आचार पाळावासा वाटतो ना ? तुम्हाला गीता मान्य आहे ना ?

**विनायक :** वाः ! गीता मान्य आहे म्हणून काय विचारतां ! बाबासाहेब दररोज गीतापठण केल्यावांचून अन्नग्रहण करीत नाहींत !

**समतानंद :** छान ! पण गीतेंतील नुसतीं अक्षरं वाचणं निराळं अन् तिच्यांतली तत्त्व आत्मसात् करणं निराळं. गीतेप्रमाणं आचरण ठेवावं असं वाटतं ना तुम्हाला बाबासाहेब ?

**बाबासाहेब :** अगदीं मनापासून वाटतं.

**समतानंद :** मग्न गीतेंत अठरापगड जाती कुठं सांगितल्या आहेत ?

**बाबासाहेब** : ( अडखळत ) पण चार वर्ण तरी आहेत ना ?

**समतानंद** : हजारों लाखो जातींवरून चार वर्णांवर आलांत ठीक आहे. मग जाती ह्या मागाहून झाल्या. चार वर्णच पूर्वी होते, एवढं तरी मान्य करावं लागेल तुम्हाला.

**बाबासाहेब** : हो.

**विनायक** : पण चार वर्णांत तरी उच्चनीचता होतीच ना ?

**समतानंद** : भगवंतांनीं काय सांगितलं आहे—
" चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः "
याचा अर्थ काय करतां तुम्ही !

**बाबासाहेब** : गुणकर्मांच्या विभागणीप्रमाणं सृष्टीमध्यें मी चातुर्वर्ण्य निर्माण केलं आहे.

**समतानंद** : तुम्ही गुणकर्मांप्रमाणं चातुवर्ण्य आजहि मानीत नाहीं. जो ब्राह्मण आईबापांच्या पोटी जन्माला आला, तो ब्राह्मण. मग ब्राह्मणाचे गुण त्याच्यांत असोत वा नसोत, ब्राह्मणाचें कर्म तो आचरो वा न आचरो ! तरी आपला ब्राह्मण तो ब्राह्मणच ! क्षत्रिय तसेच ! वैश्य तसेच ! शूद्रहि तसेच ! यांतूनच ना ह्या जाती निर्माण झाल्या ?

**बाबासाहेब** : हो हें खरं आहे; पण आपले पूर्वज, ऋषिमुनि—

**समतानंद** : ज्या ऋषींची कुळं आपण सांगतो, ते ऋषी पूर्वी कोण होते त्यांच्या जातकुळीचा कधीं विचार केला आहे का तुम्ही ?

**विनायक** : छे हो ! नदीचं मूळ नि ऋषीचें कूळ हीं शोधूं नयेत असं म्हणतात.

**समतानंद** : याचा अर्थच हा कीं, त्यांच्या जन्माचा, जातकुळीचा विचार

न करतां फक्त गुणांचाच विचार करा व त्यांना मान द्या. जातिभेद मानूं नका.

**बाबासाहेब :** मग चार वर्ण तरी मानावे कीं नाहीं ?

**समतानंद :** चार वर्ण आहेतच; पण ते जन्मजात नव्हेत, तर गुणकर्मविभागशः ! एकाच घरांत एकाच आईच्या पोटीं जन्मास आलेले चार मुलगे चार वर्णांचेहि असूं शकतील.

**बाबासाहेब :** एकंदरींत जातपात नव्हतीच असं आपलं म्हणणं ?

**समतानंद :** हो ! पूर्वीं नव्हतंच हें बंड !

**बाबासाहेब :** हें एक हिंदूंचं झालं; पण ख्रिश्चन मुसलमानांबरोबरहि जेवावं ?

**समतानंद :** देशकालवर्तमानाप्रमाणं त्यांतहि कांहीं गैर नाहीं. आज सगळं जग एक झालं पाहिजे.

**विनायक :** मग त्यांच्याबरोबर गोमांस भक्षण करावं ?

**समतानंद :** कोण म्हणतो त्यांच्याबरोबर गोमांस भक्षण करावं म्हणून ! शाकाहार करावा. तुम्ही स्वामी विवेकानंद, रामतीर्थांचीं नांवं ऐकलीं आहांत ?

**विनायक :** त्यांचे ग्रंथ तर बाबासाहेबांनीं अभ्यासिले आहेत.

**बाबासाहेब :** मी तर त्यांचा एकनिष्ठ भक्त आहे भक्त.

**समतानंद :** होय ना ? मग त्यांनीं तिकडच्या लोकांबरोबर, परधर्मी लोकांबरोबर अन्नग्रहण केलं म्हणून तुम्ही त्यांना बाटगे सबगोलंकार करणारे म्हणतां काय ?

**बाबासाहेब :** छे ! ! तसं कसं म्हणतां येईल ?

**समतानंद :** आज सगळं जग झपाट्यानं बदलत आहे. आपणाला जगाबरोबर चालायचं आहे. इतकंच नव्हे तर पाश्चात्यांनाहि धडे द्यायचे आहेत. सारी उच्चनीचता मोडून टाकायची आहे. सारी उच्चनीचता नाहींशी होईल, तेव्हांच जगांत खरी शांति नांदेल. तुमच्या चिरंजीवाचे विचार हे फार उच्च दर्जाचे आहेत. तुम्ही विचार कराल तर तुम्हालाहि ते पटतील. तुम्ही कधीं विचार केला आहे का त्यांच्या मतांचा. स्वतःपुरतं घेऊन कसं चालेल ?

**बाबासाहेब :** खरं सांगू महाराज, आज आठ दिवस मी त्याच्या मतांबद्दल सारखा विचार करतों आहें. जों जों अधिक विचार करावा तों तों त्याचं म्हणणं मला अधिकाधिक पटतं; पऽण—

**समतानंद :** पण काय ? कळतं पण वळत नाहीं. पटतं पण आचरणांत आणवत नाहीं !

**बाबासाहेब :** समाजाची भीति वाटते.

**समतानंद :** काय बाबासाहेब ? तुमच्यासारख्यांनीं समाजाला धडे द्यावयाचे सोडून समाजाला भिऊन एकुलत्या एका मुलालाच घालवून द्यावं ? काय म्हणावं तुम्हाला ?

**बाबासाहेब :** पटलं सारं आपलं म्हणणं साधु महाराज ! पण माझा मुलगा कसा भेटेल ? तुम्ही त्याची मला भेट करून द्या. तो कधीं हो भेटेल मला ?

**समतानंद :** वाटेल तेव्हां. आतां पाहिजे तर आत्तां भेटेल !

**बाबासाहेब :** काय महाराज, माझी थट्टा करतां ? माझ्या दुःखावर डागण्या नका हो देऊं !

**विनायक :** साधु महाराज, बाबासाहेबांच्या दुःखावर डागण्या नका देऊं !

**समतानंद** : थट्टा करीत नाहीं मी. पण बाबासाहेब, खरंच आपलीं मतं आपल्या चिरंजीवाच्या मताप्रमाणं झालीं आहेत कीं आपलं माझ्या तोंडापुरतं सांगतां ? मुलगा आला कीं पुन्हा येरे माझ्या मागल्या व्हायचं ! अंतःकरणपूर्वक सांगा. शपथपूर्वक सांगा. तुमच्या मुलाची भेट आत्तां होईल !

**विनायक** : तुमच्या तोंडांत साखर पडो !

**बाबासाहेब** : साधु महाराज, शपथपूर्वक सांगतों कीं मला मुलाचीं मतं अंतःकरणपूर्वक पटलीं आहेत आणि तो आतां आल्यास मी त्याच्या मताबाहेर काडीभरहि जाणार नाहीं.

**समतानंद** : अगदीं खरं ना हें ? मग आतांच तुमचा मुलगा इथं येईल ! पहा तरी चमत्कार !

**विनायक** : महाराज, योगचमत्कार करणार कीं काय ?

[ समतानंद ' जय शंकर ' ' जय शंकर ' असें मोठ्यानें बरेच वेळां म्हणतात व जोरानें शंख फुंकतात, त्याबरोबर बागेंत दडून बसलेले अण्णासाहेब, नारायण, गोविंद, अबदुल्ला, पीटर, गजाभाऊ ही सर्व मंडळी एकदम येते. बाबासाहेब व विनायक चकित होऊन आ वासून पाहूं लागतात. ]

**समतानंद** : घ्या बाबासाहेब तुमचे चिरंजीव !

[ अण्णासाहेब बाबासाहेबांना नमस्कार करतात. बाबासाहेब मुलाला उठवून कडकडून मिठी मारतात. ]

**बाबासाहेब** : ये बाळ ये ! चूक झाली माझी ! तुझी सारीं मतं मला पटलीं आहेत.

**अण्णासाहेब** : खरोखरच पटलीं ?

**विनायक** : खरोखर म्हणून काय विचारतां ? तंतोतंत पटलीं. या साधुमहाराजांनीं सारं समजावून दिलं बाबासाहेबांना.

**राजा** : ननननाहींतर कक्काठी घघघेऊन धधधांवतील ममममारयला !

**अण्णासाहेब** : यांच्या भगव्या वेषाला भाळलांत कीं खरोखरच तुम्हाला

**बाबासाहेब** : या महाराजांनीं आपल्या सुबोध वाणीनं मला सारं पटवून दिलं आहे. अरे हें काय ? सगळंच मुसळ केरांत ! तूं यांच्या पायां पड ना आधीं !

**विनायक** : हो हो पायां पडावं हें बरं. त्यांच्या कृपाप्रसादानंच आज आपलं दर्शन झालं आम्हाला !

**समतानंद** : माणसानं माणसाच्या पायां पडूं नये. उच्चनीचता वाढवूं नये. सर्वत्र समता नांदली पाहिजे.

**नारायण** : आम्ही तरी हेंच म्हणतों. आपण तर समतेचं कंकणच बांधलेलं दिसतं !

**समतानंद** : म्हणून तर नांव समतानंद घेतलं आहे. बरं बाबासाहेब आला ना मुलगा तुमचा ? मग काय करतां आतां ?

**बाबासाहेब** : आपण सांगाल तें.

**समतानंद** : पहिल्यानं साऱ्यांना चहा फराळ होऊन जाऊं द्या. दमून आली आहे मंडळी.

**बाबासाहेब** : अवश्य. विनायकराव, येऊं द्या चहाफराळ.

**विनायक** : ( गडबडीनें ) तयार, तयार !

[ चहाच्या कपबशा, फराळाचें सामान आणून प्रत्येकापुढें नोकर ठेवतात. ]

**समतानंद** : बाबासाहेब, बसा ना सर्वांबरोबर !

**बाबासाहेब** : मी बसतो सर्वांबरोबर; पण आपण ?

**विनायक** : साधुमहाराज, आपण नसलां तर बाबासाहेब कसे बसतील ?

**समतानंद** : माझी तयारी आहे.

[ समतानंद बसतात. विनायकराव बाजूला उभे राहातात. आण्णासाहब त्यांच्या हाताला धरून नारायण, अवदुल्ला व पीटर यांच्यामध्यें आणून बसवितात. ते त्याच्या तोंडाकडे व गोविंदाकडे पाहून दचकतात. सारे हंसतात. ]

**बाबासाहेब** : विनायकराव, असे घाबरूं नका. साधुमहाराजांचं सारं म्हणणं विचारांतीं मला पटलं आहे.

**विनायक** : बरोबर, बरोबर, बाबासाहेब, आपलं म्हणणं खोटं कसं असेल ?

**नारायण** : अहो थोडं चुकलं.

**बाबासाहेब** : काय, काय चुकलं ?

**नारायण** : मुसलमानाचे–ख्रिश्चनाचे निराळे कप कुठं दिसत नाहींत इथं ?

**गोविंद** : नि माझी महाराची करवंटी ! ( सारे हंसतात )

**गजा** : क क काठी उउउगारणार न न न नाहीं ना ?

**बाबासाहब** : छे छे ! अरे सारेजण मला लाजवूं नका.

[ सर्व फराळ करून चहा पिऊन कपबशा खालीं ठेवतात. बाबासाहेब उठून अवदुल्ला, पीटर, गोविंद, यांच्या पुढ्यांतले कप उचलूं लागतात. ]

**गजा** : बबबाबासाहेब ह ह हें क क काय ?

**समतानंद** : बाबासाहेब, हें काय करतां आपण ?

**बाबासाहेब :** समता, समतानंदांच्या उपदेशाप्रमाणं प्रत्यक्ष समता आचरणांत आणतो आहें.

**विनायक :** तुम्ही कशाला ? तुम्ही कशाला ? नोकर आहेत ना बाबा-साहेब ? उचलतील ते !

**अण्णासाहेब :** नाहीं, नोकरांकडून हें काम नाहीं करायचं आणि बाबासाहेबांनीहि करायचं नाहीं. मी करणार मी. [ भराभर कपबशा उचलतो. ] माझ्या घरीं आलेल्या पाहु-ण्यांचा सत्कार मीच केला पाहिजे. बाबासाहेब, आपली मान्यता व आशीर्वाद असले म्हणजे झालं.

**बाबासाहेब :** पूर्णाशीर्वाद आहेत बेटा. समतेचा प्रत्यक्ष पाठच झाला. पुढें काय आपलं म्हणणं साधुमहाराज ? आज्ञा व्हावी !

**समतानंद :** आज्ञा कसली ? त्या दिवशीं जें सहभोजन उधळलं गेलं, तें आज पार पाडलं तर बर होईलसं वाटतं.

**नारायण :** बाबासाहेब, पहा बुवा ! नाहींतर त्या दिवसाची पुनरावृत्ति व्हायची !

**बाबासाहेब :** छे मुळींच नाहीं. साधुमहाराजांचा शब्द शिरसामान्य आहे मला. मी पूर्वींच त्यांच्याकडे सारं कबूल केलं आहे.

**विनायक :** बाबासाहेबांचा शब्द म्हणजे रामबाण !

**नारायण :** पण साधु ढोंगी ठरले तर ?

**बाबासाहेब :** (हंसून) हो हो ढोंगी ठरले तरी ! त्यांचं म्हणणं मला पटलं आहे. विचारपूर्वक मी त्यांचं म्हणणं कबूल केलं आहे. मग ते साधु खरे असोत अगर खोटे असोत. पण सहभोजनाला त्या दिवशीं सारे सोब

IRBK-0103137

**गजा** : मममम्मी ससमुद्धां ?

**बाबासाहेब** : वा ! तूं तर अवश्य पाहिजेस !

**गोविंद** : एखादा कमी असला तर ?

**बाबासाहेब** : छे ! एकहि कमी होतां नये !

**पीटर** : त्या दिवशींचे सारे सोबती आहेत का रे अबदुल्ला ?

**अब्दुल्ला** : तो मानसिंग कुठं दिसत नाहीं तो ?

**गजा** : शशशशिंग उउउडवित गगगेलेला अअअसेल रररानांत ?

**नारायण** : बाबासाहेब, नसेना तो एक ? त्याला कुठं जायचं शोधायला ? चुकला तर चुकला !

**बाबासाहेब** : छे छे ! असं करूं नका. आणवा ना त्याला संध्याकाळपर्यंत ?

**विनायक** : काय अण्णासाहेब ? बाबासाहेब म्हणतात तें बरोबर आहे ना ?

**अण्णासाहेब** : बरोबर आहे.

**अबदुल्ला** : पण हें कसं जमायचं ?

**बाबासाहेब** : त्यांत एवढं काय कठीण आहे ? वाटेल ती खटपट करून त्याला आणवा ना संध्याकाळपर्यंत !

**नारायण** : संध्याकाळपर्यंत कशाला ? मी इथेंच त्याला पैदा करतों. साधुमहाराज, वाजवा तुमचा मघांचा शंख कीं होईल मानसिंग इथं हजर ! आम्ही नाहीं का सारे शंखनादाबरोबर आलों ? पाहूं तुमच्या शंखाचा पराक्रम !

[ समतानंदाच्या हातांत शंख देतो. तो जोरानें वाजवूं लागतो. ]

## : गाणें :

प्रगट हो तूं गड्या इथें कसा ॥ ध्रु० ॥
थकलों रे वाट पाहुनि तुझी
झुरतों मनिं रात्रंदिनीं
होऊं नको अदय असा ॥ १ ॥

स्वामीजी तुज बाहति
सुहृद तव आक्रंदति
धांव झणीं चपलगती
अंत आतां बघसि कसा ॥ २ ॥

[ गाणें चालू असतांना अण्णासाहेब त्याच्या हातांतला शंख काढून घेतो. पीटर व गोविंद त्याला ओढतात. "ढोंगी साधु, ढोंगी साधु, उतरा कपडे" म्हणतात. समतानंदाची कफनी काढतात. तों आंत मानसिंगाचा पोषाख केलेला मानसिंग दिसतो. बाबासाहेब व विनायक चकित होतात. सारे खो खो हंसतात. ]

**विनायक** : अरे हा कोण ?

**नारायण** : अहो हे तुमचे समतानंद !

**गजा** : ( नाचूं उड्डूं लागतो. ) वाः ! सससमतानंद ! सससमतानंद ! गगगंमत झझझाली ! गगगंमत झझझाली !!

( मोठमोठ्यानें हंसतो. सारे हसूं लागतात. )

**अण्णासाहेब** : आमचा मानसिंगराव माने.

**बाबासाहेब** : शाबास मानसिंगराव माने. तुम्ही मान राखला आमच्या घराचा. नव्हे वाढवला !

**नारायण** : ( हंसून ) पण या ढोंगी साधूचं तुम्ही ऐकूं नका बाबासाहेब !

**बाबासाहेब :** छे-छे! समतानंद आहेत ते समतानंद. संध्याकाळीं त्यांच्याच अध्यक्षतेखालीं आपलं सहभोजन व्हायचं. समतेचा विजय असो ! समतानंद महाराज की जय !

[ सारे एकदम ओरडतात. समतेचा विजय असो ! समतेचा विजय असो ! समतेचा विजय असो ! आम्ही सारे भाऊ भाऊ, आम्ही सारे भाऊ भाऊ, आम्ही सारे भाऊ भाऊ ! ]

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों.

## : गाणें :


( चाल : चल ऊठ ऊठ आतां )

हे भाऊ भाऊ आम्ही
समताच देव मानूं
ना अन्य धर्म ठावा
भाऊ सदैव राहूं ॥धृ०॥

तोडूं अम्हीच आतां
हीं बंधनें पुराणीं
खोट्या रुढीस आतां
दावूं खरेंच पाणी ॥ १ ॥

हा श्रेष्ठ हा कनिष्ठ
लवलेश भेद नाहीं
निर्मूं नवीन राष्ट्रा
संदेह यांत नाहीं ॥ २ ॥

[ पडदा पडतो ]



# स्वराज्याच्या वाटेव

## संगीत ऐतिहासिक नाटिका

लेखक : पा. ना. मिसाळ



श्रीशिवाजी महाराज यांनीं स्वतःची व संभाजीराजे यांच
सुटका औरंगजेबाचे नजरकैदेतून करून घेतल्यानंतर
वैराग्याच्या वेशानें महाराष्ट्रांत परत येत असतांनाच्य
एका प्रसंगावर हें नाटक आधारलेलें आहे. नाटकाच
भाषा सुबोध आहे. प्रवेशाची रचना सुंदर आहे. शिवा
तें स्त्रीपात्रविरहित असल्यामुळें मुलांना सहज करतां येईल

**आकर्षक मुखपृष्ठ : सहा चित्रें : मूल्य पांच आण**

जयहिंद प्रकाशन
ठाकुरद्वार मुंबई २